रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २७७
www.ramprahar.com

◆ रविवार, २६ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

पेण नगर परिषदेत दिव्यांगांना निधीचे वाटप/५

नवी मुंबईत पावसाळापूर्व तयारीला वेग/६

## आयएमडीतर्फे उष्णतेच्या लाटेबाबत मार्गदर्शक सूचना जारी



**मुंबई :** देशाच्या अनेक भागांमध्ये सतत वाढणारे तापमान आणि सरासरीपेक्षा जास्त उष्ण हवामान पाहता, पृथ्वी विज्ञान मंत्रालयांतर्गत येणाऱ्या भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) उष्णतेच्या लाटेबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे आणि सूचना जारी केल्या आहेत. एप्रिल ते जून २०२६ दरम्यान पूर्व, मध्य आणि वायव्य भारताच्या काही भागांत, तसेच आग्नेय द्वीपकल्पीय प्रदेशात सामान्यपेक्षा अधिक उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे; यामुळे सध्या सुरू असलेल्या उष्ण हवामानाच्या वातावरणात, नियमित खबरदारी घेण्यासह उपाययोजनांची आवश्यकता प्रामुख्याने आहे. मार्गदर्शक तत्त्वे अधिकृत संकेतस्थळावर (https://mausam.imd.gov.in/responsive/heatwave_guidance.php) उपलब्ध करून दिली आहेत. यात काय करावे आणि काय करू नये, पूर्वतयारीच्या उपाययोजना आणि विशेष सूचनांचा समावेश आहे.

# राज्य दुष्काळमुक्त करणार –मुख्यमंत्री

### गोदा ते नर्मदा जलयात्रेचा त्र्यंबकेश्वर येथे शुभारंभ

**नाशिक : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भव्य शुभारंभ झाला. नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वेदात नदीचे महात्म्य वर्णन केले असून नदीला आई मानले आहे. नदी स्तुतीसुक्तात ऋषींमुनींनी नदीच्या उपयुक्ततेचे वर्णन केले आहे. वारशाचे संवर्धन आणि विकास याचा समन्वय देशाच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच अहिल्यादेवींच्या विचाराच्या आधारे भविष्यातील विकासाची दिशा दाखविण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गोदावरी नदी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेशासाठी महत्वाची असल्याने ती बारमाही प्रवाहित राहावी यासाठीदेखील प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला माजी मंत्री रवींद्र चव्हाण, सदाभाऊ खोत, आमदार गोपीचंद पडळकर, राहुल आहेर, सीमा हिरे, देवयानी फरांदे, हिरामण खोसकर, दिलीप बनकर, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, ह.भ.प.संजय नाना धोंगडे, महंत उद्धव महाराज मंडलिक, मंदाकिनी मोरे, महामंडलेश्वर रामचंद्रदास मोरे, उपमहापौर विलास शिंदे आदी उपस्थित होते.

### विविध जिल्ह्यांतून होणार प्रवास

'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्या' अंतर्गत आयोजित या जलयात्रेचा मुख्य उद्देश राज्यातील जलस्त्रोतांबाबत जनजागृती करणे, लोकसहभाग वाढवणे आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा आहे. ही जलयात्रा २५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांतून प्रवास करणार आहे. यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि तरुण सहभागी झाले आहेत.

### पनवेल मालधक्का परिसरातील घरांचा प्रश्न मार्गी

## पुनर्वसनाच्या निर्णयाने झोपडपट्टीधारक आनंदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची महासभा शुक्रवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. या महासभेत विविध विषयांवर चर्चा करून अनेक महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. त्यामध्ये शहरातील मालधक्का परिसरातील प्लॉट नंबर ३८९ येथील नवनाथ नगर मधील नऊ झोपडपट्टीवासीयांच्या घरांच्या प्रश्नावर मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, माजी सभागृह नेते व नगरसेवक परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या पाठपुराव्यामुळे प्रभाग क्रमांक १७ मधील लोकमान्य नगर रेल्वे मालधक्का येथील नऊ झोपडपट्टीधारकांना न्याय मिळाला आहे. त्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळणार आहे.

प्रकाश बिनेदार यांनी प्रश्न उपस्थित करून नऊ झोपडीधारकांचे पुनर्वसन करा, असे बिनेदार यांनी सांगितले. त्यानुसार महासभेत मंजूर ठरावानुसार संबंधित झोपडपट्टीवासीयांना कायमस्वरूपी घरे उपलब्ध करून देण्यात येणार असून, तोपर्यंत त्यांना दरमहा सहा हजार रुपये भाडे देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे झोपडीधारकांत आनंदाचे वातावरण पसरले आहे.

या निर्णयासाठी सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी विशेष पाठपुरावा केला होता. तसेच आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रश्न सातत्याने महापालिकेत मांडण्यात येत होता. ठराव मंजूर झाल्यानंतर नऊ झोपडीधारकांनी नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, नगरसेवक परेश ठाकूर यांचे आभार मानले.

दरम्यान, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अस्मिता घरत, शिवानी घरत यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेवकांनी या निर्णयाचे स्वागत केले.

# इतिहास आणि लोककथांमध्ये फरक

### बागेश्वर बाबांच्या विधानावर स्पष्ट केली भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

नागपूरमधील एका कार्यक्रमात बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या संदर्भात केलेल्या विधानावरून राज्यात नव्या वादाला तोंड फुटले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना, इतिहास आणि लोककथा यांतील फरक ओळखणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. अधिकृत ऐतिहासिक संदर्भ आणि ग्रंथांमध्ये अशा कोणत्याही प्रसंगाचा उल्लेख नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.



धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित एका प्रसंगाचा उल्लेख केला होता, ज्यावरून राजकीय आणि सामाजिक स्तरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्यावर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, आपण ज्या ऐतिहासिक पुराव्यांचा अभ्यास केला आहे, त्यात शास्त्री यांनी सांगितलेल्या घटनेचा कोणताही आधार सापडत नाही. त्यामुळे ऐतिहासिक तथ्यांची मांडणी करताना अधिकृत संदर्भांचे भान ठेवणे गरजेचे आहे, असे त्यांनी सूचित केले.

## 'मराठीचा आग्रह योग्य, पण वाद नको'

**मुंबई :** रिक्षा आणि टॅक्सीचालकांना मराठी अनिवार्य असल्याच्या निर्णयानंतर काही संघटनांनी संपाची हाक दिली आहे. यावरून राजकारण तापलं असून, मनसेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. आता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. मराठीचा आग्रह योग्य आहे; पण वाद नको, असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मराठी बोलता येत नसलेल्या रिक्षा, टॅक्सीचालकांना मराठी शिकवणार आहोत, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

मुंबई असो किंवा महाराष्ट्र असो, येथे मराठीचा आग्रह असणे किंवा मराठी भाषेला प्राथमिकता द्यायला हवी यात काही चुकीचं नाही. जे आमच्याकडील रिक्षा-टॅक्सीचालक आहेत, यातील ज्यांना मराठी येत नाही, त्यांना आम्ही मराठी शिकवणार. देशात सक्ती वैगेरे करून भाषेच्या नावावर हिंसा करणे स्वीकारार्ह नाही. त्यामुळे आम्ही रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी शिकवू. कुणावरही अन्याय होऊ देणार नाही, असंही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची आज निवडणूक

**मुंबई : प्रतिनिधी**

वैद्यकीय परिषदेवरील नऊ सदस्यांच्या निवडीकरिता २६ एप्रिल, २०२६ रोजी निवडणुकांचे आयोजन राज्यात करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी ६० उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून नोंदणीकृत व नोंदणीचे नूतनीकरण केलेले सुमारे १,४०,००० मतदार मतदानाचा हक्क बजावू शकतील.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार वैद्यकीय परिषदेतील नऊ सदस्यांची निवड ही राज्यातील नोंदणीकृत व नोंदणीचे नुतनीकरण केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांमार्फत करण्यात येते.

या निवडणुकीकरीता राज्यातील जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी, जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणांतर्गत निवडणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हानिहाय निवडणूक केंद्र व मतदारयादी यांचा तपशील महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या वेबसाइटवर (www.maharashtramedicalcouncil.in) उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. २६ एप्रिल, २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीकरीता मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० अशी आहे. मतमोजणीचे नियोजन २९ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता पासून मतमोजणी संपेपर्यंत हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ येथे करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रसिद्धपत्रकाद्वारे कळविले आहे.

## निवडक

### बीएमसी अधिकारी अडीच लाखांची लाच घेताना जेरबंद

**मुंबई :** पालिकेच्या एफ नॉर्थ विभागातील अधिकाऱ्याला एसीबीकडून अटक करण्यात आली आहे. विशाल भालचंद्र वाणी असे आरोपी अधिकाऱ्याचे नाव आहे. हा अधिकारी एफ नॉर्थ विभागात दुय्यम अभियंता म्हणून कार्यरत आहे. बांधकाम साईटसाठी जल निष्कासन परवानगीसाठी १० लाखांच्या लाचेची मागणी केली. त्यानंतर या अधिकाऱ्याला सापळा रचून एसीबीने कारवाई केली. अडीच लाख रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडलं. संबंधित अधिकारी प्रजन्य जल वाहिनी विभागात कार्यरत आहे.

### अमली पदार्थ तस्करीतील प्रमुख सूत्रधार गजाआड

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी नेटवर्कमधील एक प्रमुख सूत्रधार आणि कुख्यात भारतीय ड्रग लॉर्ड सलीम डोला याला तुर्कीच्या सुरक्षा यंत्रणांनी इस्तंबूलमध्ये एका मोठ्या कारवाईत अटक केली आहे. भारतीय सुरक्षा यंत्रणांनीही त्याच्या अटकेला दुजोरा दिला आहे. ही कारवाई गुन्हेगारी जग आणि अमली पदार्थ नेटवर्कविरुद्ध एक मोठे यश मानली जात आहे. सलीम डोलाच्या नेटवर्कचे संबंध भारताचा मोस्ट वॉन्टेड अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या टोळीशी देखील आहेत.

# 'मिसिंग लिंक'चे १ मे रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

### प्रवास वेळ ३० मिनिटांनी होणार कमी



**मुंबई : प्रतिनिधी**

बहुप्रतीक्षित मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाचे १०० टक्के काम पूर्ण झाले असून चाचण्याही यशस्वी झाल्या आहेत. त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकार्पणासाठी १ मेची तारीख निश्चित करून त्यासाठी वेळ दिला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) लोकार्पणाच्या तयारीला वेग दिला आहे. खोपोली येथील बोगद्यात १ मे रोजी लोकार्पणाचा कार्यक्रम होणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत लोकार्पण होणार असून त्यानंतर ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल झाल्यास मुंबई-पुणे प्रवासाचा कालावधी ३० मिनिटांनी कमी होणार आहे. त्यामुळे ही प्रवाशांसाठी मोठा दिलासा देणारी बाब ठरणार आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि मुंबई-पुणे प्रवास आणखी जलद करण्यासाठी एमएसआरडीसीने खोपोली कुसगाव दरम्यान १३.३ किमी लांबीची नवीन मार्गिका बांधण्याचा निर्णय घेतला. ही मार्गिका म्हणजेच मिसिंग लिंक. या मिसिंग लिंकच्या कामाला २०१९ मध्ये दोन टप्प्यांत सुरुवात करण्यात आली. हे काम २०२१ मध्ये पूर्ण होऊन ही मार्गिका सेवेत दाखल होणे अपेक्षित होते, मात्र अनेक कारणांमुळे या मार्गिकेला विलंब झाला असून अजूनही ही मार्गिका सेवेत दाखल झालेली नव्हती, पण एमएसआरडीसीने एप्रिल २०२६ अखेर प्रकल्पाचे काम पूर्ण करून १ मे २०२६ रोजी मिसिंग लिंक सेवेत दाखल करण्याचे जाहीर केले.

मुख्यमंत्र्यांकडे लोकार्पणासाठी वेळ मागितली होती. मुख्यमंत्र्यांनी १ मेची वेळ दिली आहे. तेव्हा १ मे रोजी मिसिंग लिंकचे लोकार्पण होणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

## उष्माघाताने बाळाचा मृत्यू

**लातूर :** एकीकडे अवकाळी पावसाने राज्यात हैदोस घातला, तर दुसरीकडे दिवसेंदिवस उकाडा वाढत चालला आहे. वाढत्या उकाड्याने नागरिक हैराण झाले असून या उष्मघाताने कित्येक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अशातच लातूरमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. नुकतंच जगाची ओळख झालेल्या नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्मघाताने मृत्यू झाला आहे.

जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत चालला आहे. लातूरमध्ये दुपारी दोन ते तीन वाजण्याच्या वेळेत ४० ते ४१ अंश सेल्सिअस वर तापमान गेले आहे. चार दिवसापूर्वी औराद शहाजनी येथे साठ वर्षे शेतकऱ्याचा उष्माघातानी मृत्यू झाला होता, तर आज औसा तालुक्यातल्या गोंद्री येथे नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. सततच्या घडणाऱ्या या घटनांनी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## माणगाव पोलीस ठाण्यातील सहा कर्मचाऱ्यांचे निलंबन

**माणगाव : बातमीदार**

जिल्हा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा (एलसीबी) माणगाव येथे कार्यरत असलेल्या सहा पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याने संपूर्ण पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

निलंबितमध्ये उपनिरीक्षक अविनाश चंद्रकांत पाटील, संदीप सुरेश पहेलकर, बाबासो ज्ञानु पिंगळे, मोरेश्वर तुकाराम ओमले, ओंकार संतोष सोंडकर, लालासो महादेव वाघमोडे यांचा समावेश आहे.

माणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका बंद कंपनीतून माल चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात काही मुद्देमाल माणगाव पोलिसांनी हस्तगत केला होता, मात्र त्या मुद्देमालाची नोंद कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आल्याची गंभीर विसंगती उघडकीस आली. ही बाब पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ कठोर पाऊल उचलत संबंधित सहा कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले.

### नवी मुंबईत आज आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा

**नवी मुंबई :** नेक्सस सीवूड मॉल, सेक्टर ४०, नेरूळ येथे २६ एप्रिल २०२६ रोजी प्रथमच आयबीए ग्लोबल बॉक्सिंग सिरीज या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन संध्या. ६ ते ९ वा. या वेळेत मरिन बॉक्सींग ॲकेडमी या बॉक्सिंग क्षेत्रातील नामांकित संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा विभागाचे सहकार्य या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी असणार असून यामध्ये जगभरातील नामांकित बॉक्सर सहभागी होणार आहेत. भारताच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या सुप्रसिद्ध बॉक्सर मेरी कोम यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमास लाभणार आहे.

## एजे क्रिकेट अकादमी टीआयपीएल सिझन बॉल क्रिकेट स्पर्धेची मानकरी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एजे क्रिकेट अकादमीने ॲडव्हान्स क्रिकेट क्लबला नमवत सोसायटी क्रिकेट क्लब यांच्या वतीने 'टीआयपीएल सिझन ३ अंडर १९' या भव्य सिझन बॉल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. त्यांना भारतीय जनता पक्ष रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

पनवेल शहरातील मिडल क्लास सोसायटीच्या मैदानात रंगलेल्या यास्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी झाले होते. ११ एप्रिल ते २४ एप्रिल दरम्यान आयोजित या स्पर्धेत एजे क्रिकेट अकादमी व ॲडव्हान्स क्रिकेट क्लब यांच्यात अंतिम सामन्यात रंगला. यात एजे क्रिकेट अकादमीने बाजी मारली. त्यांना ६० हजार रुपये व भव्य चषक देऊन गौरवण्यात आले. तर ॲडव्हान्स क्रिकेट क्लबने द्वितीय क्रमांक मिळवत ४० हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले. तर क्रिश पाटील याने मालिकावीर, पार्थ पवार सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक, अवी जैन सर्वोत्कृष्ट गोलंदाज, आर्यन निकाळजे याने सर्वोत्कृष्ट फलंदाजचा मान पटकावला.

यावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आयोजक व नगरसेवक सुमित झुंझारराव, भाजप नेते अमित ओझे, उल्हास झुंजारराव, रूपेश नागवेकर यांच्यासह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक हिवताप दिनानिमित्त रायगडात ठिकठिकाणी जनजागृती

**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक हिवताप दिनानिमित्त शनिवारी (दि. २५) राजिप आरोग्य विभागांतर्गत असणारे प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वतीने गावागावात प्रभातफेरी काढून जनजागृती करण्यात आली.




उपकेंद्र रीस अंतर्गत जिल्हा परिषद मराठी शाळा रीस या ठिकाणी गावामध्ये प्रभात फेरी काढून हिवतापाविषयी जनजागृती केली. कार्यक्रमासाठी वासंबे जिल्हा परिषद गटाच्या सदस्या नेहा पारंगे, आरोग्य पर्यवेक्षक भस्मा अण्णा, रीस उपकेंद्र कर्मचारी, शिक्षक, आशासेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस उपस्थित होते. उपकेंद्र मोहोपाडा व वासांबे यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सकाळी ९ वाजता सुरू झालेल्या या प्रभातफेरीत सुमारे ४० विद्यार्थी व ४ शिक्षक सहभागी झाले होते. तसेच आरोग्यसेवक गणेश भगत, रोशन निंबाळकर, दादासाहेब जगताप तसेच आशा सेविका यांनीही सक्रिय सहभाग घेतला. "हिवतापाला आळा घाला", "स्वच्छता ठेवा, डास दूर ठेवा" अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृती केली. फेरीदरम्यान नागरिकांना हिवताप प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

उपकेंद्र लोहोप यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रभातफेरीत सरपंच दिपाली नरेंद्र पाटील, विद्यार्थी, शिक्षक, आरोग्य सहाय्यक जी. बी. बडदडे, आरोग्यसेवक एम. एल. तांबडे, अंगणवाडी सेविका तसेच आशा सेविका यांनीही सक्रिय सहभाग घेतला.

हे सर्व कार्यक्रम राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अश्विनी सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.

तालुका आरोग्य कार्यालय पंचायत समिती रोहा व BAUDS फाउंडेशन पुणे यांचे संयुक्तपणे कै.द.ग. तटकरे सभागृह येथे जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी पंचायत समिती विजया विजय पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, **(पान २ वर..)**

# कुंभमेळा विकासकामांना अधिक गती देणार : मुख्यमंत्री फडणवीस

## त्र्यंबकेश्वराचे घेतले दर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे विकास कामे समाधानकारकरितीने होत असून आगामी काळात या कामांना अधिक गती देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार हिरामण खोसकर, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, महंत हरिगिरीजी महाराज (जुना आखाडा), महंत रविंद्रपुरीजी महाराज (निरंजनी आखाडा), महंत शंकरानंद (आनंद आखाडा), महंत गिरिजानंद, महंत रामकृष्ण लहवितकर यांच्यासह मंदिर देवस्थानचे विश्वस्त उपस्थित होते.

मंदिर देवस्थानच्या वतीने मुख्याधिकारी योगेश जाधव, कैलास घुले, मनोज थेटे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार केला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पुढील वर्षी कुंभमेळा होत आहे. त्या अनुषंगाने विविध विकास कामे करण्यात येत आहेत. सिंहस्थ कुंभमेळा जवळ येत आहे. त्यामुळे या कामांना अधिक गती देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. त्र्यंबकेश्वर येथील विकास कामाच्या अनुषंगाने येथील सर्व आखाड्यांच्या महंतांशी लवकरच चर्चा करणार असून त्यासाठी एक बैठक घेणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक डायलिसिस मशीनचे लोकार्पण; रुग्णांना मोठा दिलासा

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन शहर आणि परिसरातील किडनीच्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी एक आनंदाची बातमी आहे. श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात नव्याने बसविण्यात आलेल्या अत्याधुनिक डायलिसिस मशीनचा लोकार्पण सोहळा नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



या नवीन सुविधेमुळे स्थानिक स्तरावरच दर्जेदार उपचार उपलब्ध होणार असून रुग्णांची मोठी गैरसोय टळणार आहे. आतापर्यंत डायलिसिससाठी रुग्णांना माणगांव येथे जावे लागत होते, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत असे. मात्र, या नवीन मशीनमुळे आता श्रीवर्धनमध्येच उच्च दर्जाचे उपचार मिळतील. उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसिस मशीनची एकूण संख्या आता पाच झाली असून, दररोज साधारण १० रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी रुग्णालयाची पाहणी केली आणि आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक असलेल्या इतर वैद्यकीय उपकरणांची यादी सादर करण्याचे निर्देश दिले. ही सर्व साधने पुढील दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. आरोग्य सुविधेच्या लोकार्पणासोबतच शहरातील इतर महत्त्वाच्या विकासकामांचीही पाहणी करण्यात आली.

यामध्ये प्रामुख्याने खालील प्रकल्पांचा समावेश होता भुवनाळे तलाव सौंदर्यीकरण, शिवसृष्टी प्रकल्प, पेशवे मेमोरियल, जीवना जेट्टी, वन पर्यटन विकास आदी ठिकाणी भेटी देऊन विकास कामाचा आढावा घेतला या सोहळ्याला रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्यासह मुख्याधिकारी विराज लबडे, डॉ. कौस्तुभ केळस्कर, नगराध्यक्ष अतुल चौगुले, उपनगराध्यक्ष अनंत गुरव, नगरसेवक भावेश मांजेरेकर, बाळकृष्ण गोरनाक, माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

# प्रकाश सावंत यांना स्व. संतोष पवार स्मृती पुरस्कार जाहीर

**कर्जत : प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारितेचा गौरव करण्यासाठी कर्जत प्रेस क्लबतर्फे दिला जाणारा मानाचा 'स्व. संतोष पवार स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार २०२६' यंदा नवशक्ति चे संपादक प्रकाश सावंत यांना जाहीर झाला आहे. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय योगदानाची दखल घेत ही निवड एकमताने करण्यात आली. स्व. सुनील दांडेकर स्मृती जिल्हास्तरीय पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार विजय मोकल (पेण) यांना, तर स्व. धर्मानंद गायकवाड स्मृती तालुकास्तरीय पुरस्कार युवा पत्रकार मोतीराम पादीर (कर्जत) यांना देण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा सोमवार, दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता मंडलिक सभागृह, बडोदा बँकेजवळ, नेरळ – कर्जत येथे पार पडणार आहे.



मराठी पत्रकार परिषद, मुंबईचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेशभाऊ लाड, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, सभापती नमिता घारे, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, चंद्रकांत चौधरी आदी उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास आवर्जून उपस्थित रहावे. अशी विनंती कर्जत प्रेस क्लबच्या वतीने करण्यात आली आहे.

# वाळसुरे ग्रामपंचायतीची पोटनिवडणूक रद्द; ना.जयकुमार गोरे यांचा निर्णय

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील किल्ले रायगड च्या पायथ्याशी असलेल्या वाळसुरे ग्रामपंचायतचे सरपंच यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी न केल्याच्या कारणाने निलंबित करण्यात आले होते. मात्र या निलंबन प्रकरणी सरपंच यांनी ग्राम विकास मंत्री यांच्याकडे दात मागितल्यावर गृहमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रकरणी सदर प्रकरणी जबाबदारी ग्रामसेवक यांची असून सरपंच याप्रकरणी निर्दोष असल्याचे सिद्ध झाल्याने त्यांचा कार्यकाल पूर्ववत केला आहे. त्यामुळे वाळसुरे सरपंचपदाची होऊ घातलेली पोट निवडणूक महाड तहसीलदार यांनी रद्द केली आहे.



महाड तालुक्यातील किल्ले रायगड च्या पायथ्याशी असलेल्या वाळसुरे ग्रामपंचायत मध्ये १४ एप्रिल २०२३ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी न केल्या कारणाने वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष श्याम कासारे व इतर यांनी या विरोधात मुख्याधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार तत्कालीन सरपंच प्रवीण किसन माने यांना शासनाने निलंबित केले होते. या प्रकरणी सरपंच यांनी विभाग आयुक्त कोकण विभाग नवी मुंबई यांच्याकडे दाद मागितले मात्र १६ एप्रिल २०२५ रोजी विभागीय आयुक्त कोकण यांनी सरपंच प्रवीण माने यांची सदरील निलंब कायम केले होते. याप्रकरणी प्रवीण माने यांनी ग्राम विकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे न्यायासाठी दाद मागितली. याप्रकरणी ९ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये माने यांचे अपील मान्य करत, विभाग आयुक्त कोकण यांचा १६ एप्रिल २०२५ रोजी चा आदेश रद्द करण्यात आला. तसेच सरपंच माने हे याच पदावर त्यांचा कार्यकाल पूर्ण करतील असा आदेश मंत्रालयाने दिला आहे.

सरपंच प्रवीण माने यांच्या निलंबना नंतर वाळसुरे ग्रामपंचायतची पोटनिवडणूक जाहीर झाली होती. या पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करून येत्या २८ एप्रिल रोजी मतदान होणार होते. मात्र महाडचे तहसीलदार महेश शितोळे यांना संबंधित आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सदर वाळसुरे ग्रामपंचायतीची पोटनिवडणूक रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. या अनुषंगाने सदरचे निवडणूक प्रक्रिया थांबवण्यात आली आहे, व सरपंच प्रवीण किसन माने यांना या पदावर कायम करण्यात आले आहे. सदर सदर

सरपंच प्रवीण माने यांच्यासह या ग्रामपंचायतीने नागेंद्र राठोड यांच्या नेतृत्वाखाली भाजपामध्ये प्रवेश केला होता. भारतीय जनता पार्टीचे नेते नामदार प्रवीण दरेकर यांच्या प्रयत्नातूनच हा न्याय मिळाल्याचे सरपंच प्रवीण माने यांनी सांगितले असून, याप्रकरणी भाजपचे नेते नागेंद्र राठोड, भाजपाचे राज्य परिषद सदस्य बिपिन महामुणकर, मंडल अध्यक्ष निलेश देवगिरकर, चंद्रजीत पालांडे, महेश शिंदे, सागर सकपाळ यांनी पाठपुरावा करत विशेष मेहनत घेतल्यामुळेच आपल्याला हा न्याय मिळाला असल्याचे माने यांनी यावेळी सांगितले. दरम्यान प्रवीण माने यांना पुन्हा सरपंच पद बहाल झाल्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# स्ट्रक्चरल ऑडिटबाबत नागरिकांना नवी मुंबई पालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील विद्यमान इमारतींचे विभागनिहाय सर्वेक्षण करुन पावसाळ्यापूर्वी सदर इमारत धोकादायक असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ अन्वये प्रवर्गनिहाय धोकादायक म्हणून घोषित करण्यात येतात. सी–१ प्रवर्गातील इमारती या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रिकाम्या करणेबाबत त्या त्या सहकारी गृहनिर्माण संस्थाना नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६५ (अ) नुसार ज्या इमारतींचा वापर सुरु होऊन ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट संबंधित गृहनिर्माण संस्थेने एक वर्षाच्या मुदतीच्या आत नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडूनच करुन घेणे अनिवार्य आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्था अधिनियम १९६८ अन्वये शासनाने जारी केलेल्या Model Bye–law मधील मुद्दा क्र.७६ (अ) (i) नुसार इमारतीचे आयुर्मान १५ ते ३० वर्षांच्या दरम्यान असल्यास किमान ५ वर्षातून एकदा तसेच ७६ (अ) (ii) नुसार इमारतीचे आयुर्मान ३० वर्षांपेक्षा जास्त असल्यास किमान ३ वर्षातून स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेणे अनिवार्य आहे. स्ट्रक्चरल ऑडिट हे महानगरपालिकांमध्ये नोंदणीकृत असलेल्या स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडूनच करुन घेणेबाबतची तरतूद आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नजिकच्या काळात विद्यमान इमारतीमधील सदनिकांमध्ये अंतर्गत फेरबदलाची कामे ज्यामध्ये लाद्या (Flooring) बदलणे, अंतर्गत असलेले आरसीसी कॉलम बीम्स (RCC Coloumn / Beams) यांची दुरुस्ती करताना स्लॅब खालच्या मजल्यावर कोसळण्याच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे.

अनुषंगाने नमूद करण्यात येते की, नवी मुंबई महानगरपालिकेस लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदी विचारात घेता इमारतीच्या अंतर्गत वा बाह्य भागात दुरुस्ती / सक्षमीकरण (Strengthening) करणेसाठी परवानगी प्राप्त करण्याची आवश्यकता असल्यास तथा अंतर्गत व बाह्य भागात दुरुस्तीचे काम करतेवेळी नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेमार्फत नवी मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी प्राप्त करुन घेऊन त्यांच्या देखरेखीखाली करणेच अनिवार्य आहे.


त्याचप्रमाणे ज्या बाबींकरीता नियमावलीतील तरतुदीनुसार अंतर्गत फेरबदलाचे काम करताना परवानगी घेण्याची आवश्यकता नाही, अशा बाबतीत देखील सदर काम करतेवेळी नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचे देखरेखीखालीच करण्यात यावे. तसेच सदर काम करतेवेळी सोसायटीस अवगत करणे आवश्यक असून संबंधित सोसायटीने सदर काम हे नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचे देखरेखीखाली करणे आवश्यक राहील. तसेच भविष्यात अशा स्वरुपाच्या कामांमुळे काही दुर्घटना घडल्यास त्यास संबंधित सदनिकाधारक व सोसायटीचे अध्यक्ष / सचिव यांना देखील जबाबदार धरण्यात येईल. सबब, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात यापूर्वी घडलेल्या दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची कृपया नोंद घेणेबाबत याद्वारे नागरिकांना, सहकारी गृहनिर्माण संस्था व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना नवी मुंबई महानगरपालिकेकडून जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

तरी, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील नागरिक, इमारतधारक, सहकारी गृहनिर्माण संस्था व त्यांचे पदाधिकारी यांनी उपरोक्त बाबींची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही / खबरदारी घ्यावी असे नवी मुंबई पालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

# शिक्षकांसाठी ई–केवायसी अनिवार्य; मे महिन्याच्या वेतनावर परिणाम होण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वित्त विभागाने दिलेल्या आदेशानुसार शालार्थ प्रणालीद्वारे वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी बँक खात्याची ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास मे महिन्याचे वेतन रोखले जाण्याची शक्यता असल्याने शिक्षक संघटनांनी तातडीने कार्यवाहीचे आवाहन केले आहे.




राज्य शासनाने २७ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार शासकीय, निमशासकीय तसेच अनुदानित संस्थांमधील सर्व कर्मचाऱ्यांनी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. अंमलबजावणीदरम्यान अनेक शिक्षकांना तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने सविस्तर मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शिक्षकांनी आपले आधार कार्ड कोणत्या बँक खात्याशी लिंक आहे याची पडताळणी एनपीसीआय किंवा आधारच्या अधिकृत संकेतस्थळावरून करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.जर आधार क्रमांक पगार खात्याशी जोडलेला असेल तर स्वतंत्र ऑनलाइन प्रक्रिया आवश्यक नसून केवळ ई–केवायसी फॉर्म भरून बँकेत पडताळणी करावी लागेल. मात्र, आधार इतर खात्याशी लिंक असल्यास एनपीसीआय पोर्टलवर जाऊन पगार खाते अद्ययावत करणे आवश्यक आहे. तसेच नाव, जन्मतारीख किंवा इतर तपशीलांमध्ये तफावत असल्यास ती तातडीने दुरुस्त करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

या संदर्भात समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी सर्व शिक्षकांनी वेळेत ई–केवायसी पूर्ण करावी, जेणेकरून वेतन अडचणीत येणार नाही, असे आवाहन केले आहे. ही माहिती राज्य प्रसिद्धीप्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.एकूणच, प्रशासकीय आदेश आणि तांत्रिक प्रक्रिया यांचा समतोल राखत शिक्षकांनी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मजूर संस्थांना न्याय देण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मजूर संस्थांना कामे मिळवून देण्यासाठी नवीन नियमावली आणि आरक्षण लागू केले असतानाही, रायगड जिल्ह्यात मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे समोर आले आहे. या गंभीर विषयावर भाजप नेते माजी आमदार पंडित पाटील यांनी आवाज उठवला असून, स्थानिक मजूर संस्थांना न्याय देण्याची मागणी केली आहे.



माजी आमदार पंडित पाटील यांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांचीही भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. त्यानंतर पंडित पाटील यांनी सांगितले की, राज्य सरकारने मजूर संस्थांसाठी ३३ टक्के कामे मजूर सहकारी संस्थांसाठी आरक्षित.३३ टक्के कामे सुशिक्षित बेरोजगारांसाठी.३३ टक्के कामे खुल्या निविदेद्वारे तसेच, 'अ' वर्गाच्या संस्थांना ५० लाखांपर्यंत, तर 'ब' आणि इतर वर्गातील संस्थांना २५ आणि १५ लाखांपर्यंतची कामे देण्याची तरतूद आहे. जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभाग हे या नियमांचे पालन करत नाहीत. यामुळे स्थानिक भूमीपुत्रांच्या मजूर संस्थांना कामे मिळत नाहीत.

या संदर्भात आपण विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आणि सहकार क्षेत्रातील नेते प्रवीण दरेकर यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. दरेकर यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत, संबंधित विभागाच्या मंत्र्यांसोबत तातडीने बैठक लावण्याचे आश्वासन दिले आहे, असे त्यांनी सांगितले.

पान १ वरुन

## जागतिक हिवताप दिनानिमित्त रायगडात ठिकठिकाणी जनजागृती


सदस्य किसन मोरे, समृद्धी कोळी, अरुणा हंबिर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियंका साळुंके, BAUDS फाउंडेशनचे अनरजित चौहान, पेस्ट कंट्रोल असोसिएशन ठाण्याचे व्हाइस प्रेसिडेंट दिपक चव्हाण, एक्स ट्रेजरर राजू सोनी, आरोग्य पर्यवेक्षक तालुका आरोग्य अधिकारी अनिल हावरे आदी उपस्थित होते. यावेळी हिवताप आजाराबाबत चित्रफितीचे सादरीकरण करण्यात आले. शालेय स्तरावर निबंध स्पर्धा घेण्यात आली होती.

स्पर्धेमध्ये तालुक्यातील ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी ५ उत्कृष्ठ निबंध लेखन केलेल्या विद्यार्थ्यांना, तसेच रोहा तालुका आरोग्य विभागातील हिवताप आजार निर्मुलनासाठी उल्लेखनिय कामगिरी केलेल्या आशा स्वयंसेविका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक व आरोग्य सेविका व प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांना गौरविण्यात आले.

# पं.स.सदस्य साक्षी कांबळेकरांच्या पतीचा राष्ट्रवादीत प्रवेश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रू नसतो अथवा कायमचा मित्र नसतो, या उक्तीचा प्रत्यय देणाऱ्या पोलादपूर तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पोलादपूर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह सुतारवाडी दौरा केला आणि खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते प्रवेशामुळे तालुक्यात प्रवेशकर्त्यांचे वजन वाढणार असल्याची चर्चा सुरु झाली. यावेळी शेकाप व शिवसेना युतीच्या पंचायत समिती सदस्या साक्षी कांबळेकर यांचे पती शैलेश कांबळेकर यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने त्यांच्या कुटूंबामध्ये खऱ्या अर्थाने 'महायुती' साकारली आहे.



पोलादपूर तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या काही कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस भाजप युतीच्या उमेदवारांचया प्रचारसभेमध्ये भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यापैकी मनसेच्या विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष प्रवीण पांडे आणि त्यांचे बंधू प्रफुल्ल पांडे यांनी खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. याचवेळी शेतकरी कामगार पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते समीर चिपळूणकर आणि संजय महाडीक यांनी उमाजी जाधव, नासीर नाडकर, नंदू महाडीक, किशोर आंग्रे, शरद रेवणे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनीदेखील खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. शैलेश कांबळेकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेश खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला.

# जनगणना २०२७साठी पनवेल मनपा सज्ज

**पनवेल : प्रतिनिधी**

भारताच्या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रम असलेल्या जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यातील तयारीचा एक भाग म्हणून पर्यवेक्षक व प्रगणकांसाठी पनवेल महानगरपालिकेकडून तीन दिवसीय सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रम २३ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व्हि.के. हायस्कूल (इंदुबाई वाजेकर इंग्लिश माध्यम) येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात आगामी जनगणनेच्या दृष्टीने सर्व तांत्रिक माहिती, क्षेत्रिय कामकाज, प्रत्यक्ष सराव अशा विविध बाबींवर सविस्तर माहिती देण्यात आली.





## पर्यवेक्षक व प्रगणक प्रशिक्षण

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जनगणना प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या कर्मचारी वर्गाला अद्ययावत डिजिटल प्रणाली, तांत्रिक कौशल्ये आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय कामासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियांची सखोल माहिती देणे हा होता. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार यंदाच्या जनगणनेत डिजिटल माध्यमांचा व्यापक वापर करण्यात येणार असून त्यानुसार मोबाईल ॲप आधारित डेटा संकलन पद्धतीवर विशेष भर देण्यात आला.

प्रशिक्षणादरम्यान हाऊस लिस्टींग अँड हाउसिंग सेन्सस या टप्प्याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. घरांची नोंद, कुटुंबीयांची प्राथमिक माहिती, निवास स्थिती, उपलब्ध सुविधा इत्यादी घटकांची अचूक नोंदणी कशी करावी याचे प्रात्यक्षिकांसह स्पष्टीकरण देण्यात आले. तसेच मोबाईल ॲपच्या माध्यमातून डेटा एंट्री, व्हॅलिडेशन, त्रुटी दुरुस्ती, रिअल-टाईम डेटा सबमिशन आणि डेटा सुरक्षा याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षण अधिक प्रभावी आणि परिणामकारक होण्यासाठी प्रत्यक्ष सराव, गटचर्चाआणि प्रात्यक्षिक सत्रे आयोजित करण्यात आली. प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यांकन करण्यासाठी ऑनलाइन चाचणी घेण्यात आली. यामुळे सहभागी कर्मचाऱ्यांची तयारी तपासून त्यांना आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यात आल्या.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, या पूर्वी प्रशिक्षित करण्यात आलेल्या ४५ फील्ड ट्रेनर्स यांनी अत्यंत प्रभावीपणे प्रशिक्षणाची जबाबदारी पार पाडत संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली. या कार्यक्रमास उपायुक्त प्रसन्नजित कार्लेकर, उपायुक्त (जनगणना) अभिषेक पराडकर, जिल्हा जनगणना प्रमुख अमनकुमार तसेच जनगणना प्रमुख रविना येवले यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणनेचे महत्त्व, अचूक माहिती संकलनाची गरज आणि नागरिकांशी प्रभावी संवाद कसा साधावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

पनवेल महानगरपालिकेकडून जनगणना २०२७ संदर्भात जनजागृती, स्व-गणना (Self Enumeration) प्रोत्साहन आणि तांत्रिक तयारी यावरही विशेष भर दिला जात आहे. नागरिकांनी स्व-गणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे पनवेल महानगरपालिकेकडे तांत्रिकदृष्ट्या सक्षम, प्रशिक्षित व जबाबदार मनुष्यबळ उपलब्ध झाले असून, जनगणना २०२७ हे कार्य अचूक, पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने पार पाडण्यासाठी महानगरपालिका पूर्णपणे सज्ज झाली आहे.

### पुढील टप्प्यात पर्यवेक्षक

*व प्रगणकांसाठी अधिक सखोल व क्षेत्रनिहाय प्रशिक्षण कार्यक्रम २८ एप्रिल ते ३० मे २०२६ व ४ मे ते ६ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजासाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण केली जाणार आहे. सुमारे २०५० प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण ३ टप्प्या मध्ये पार पडणार आहे.*

# उरणमध्ये भोंदूबाबा खरातच्या पत्नीच्या नावावर जमीन व्यवहार

**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबई, मुंबईप्रमाणे तिसरी मुंबई म्हणून उरण परिसरातील जमिनींचे भाव गगनाला भिडले आहेत. भोंदूबाबा अशोक खरात याने असंख्य महिलांचा लैंगिक छळ करून त्यांना आर्थिकदृष्ट्यादेखील लुटले आहे.

या भोंदूबाबा अशोक खरातची पत्नी कल्पना खरात हिच्या नावे रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीत २० गुंठे असल्याने उघड झाले आहे. विशेष म्हणजे अशोक खरात यांची पत्नी फरार असताना हा व्यवहार कसा करण्यात आला यावर शंका कुशंका व्यक्त करण्यात येत आहेत.राज्यभर गाजत असलेल्या भोंदूबाबा आरोपी अशोक खरात प्रकरण याच्याशी संबंधित एक धक्कादायक जमीन व्यवहार रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात उघडकीस आला आहे. यामुळे महसूल व नोंदणी विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उरण तालुक्यातील चाणजे गावात १२ मार्च २०२६ रोजी सर्वे क्रमांक ३७१/३ (क्षेत्र ०.२०.०० आर) ही जमीन अस्मिता अविनाश म्हात्रे आणि कैलास मिश्रीमल शहा यांनी भोंदूबाबा अशोक खरात याची पत्नी कल्पना अशोक खरात हिच्या नावावर नोंदणीकृत खरेदीखताद्वारे हस्तांतरित केली. या व्यवहाराची किंमत सुमारे ५८ लाख ५० हजार रुपये असल्याची माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे, हा संपूर्ण व्यवहार अशोक खरातची पत्नी फरार असल्याच्या चर्चेदरम्यान झाल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर अवघ्या पाच दिवसांत, १७ मार्च २०२६ रोजी तलाठी कार्यालयाकडून वर्दी नोटीस जाहीर करण्यात आली. याच दिवशी अशोक खरात याला अटक झाल्याची नोंद आहे. एकाच दिवशी अटक आणि महसूल प्रक्रिया पार पडल्याने नागरिकांमध्ये संशय अधिकच गडद झाला आहे.

यानंतर १३ एप्रिल २०२६ रोजी फेरफार क्रमांक ८३५१ मंजूर करण्यात आला. म्हणजेच अवघ्या एका महिन्यात संपूर्ण महसूल प्रक्रिया पूर्ण झाली. सामान्य नागरिकांना सातबाऱ्यावर नाव चढवण्यासाठी महिने किंवा वर्षे लागतात, मात्र या प्रकरणात वेगाने प्रक्रिया झाल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या प्रकरणात दुय्यम निबंधक कार्यालय, तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तसेच जमीन विक्रेते अस्मिता म्हात्रे आणि कैलास शहा यांनी कागदपत्रांची तपासणी व ओळख पडताळणी योग्य पद्धतीने केली होती का, याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे.

संबंधित परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर, चाणजे ग्रामपंचायत हद्दीत आधुनिक करंजा बंदर, करंजा रेवस रो-रो सेवा यामुळे या भागातील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे या परिसरातील नागरिक जमिनी घेऊन गुंतवणूक करत आहेत, मात्र मार्च महिन्यात झालेला हा व्यवहार महसूल विभागाने रद्द केल्याची माहिती उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली. हा प्रकार अतिशय गंभीर आहे. सामान्य शेतकऱ्यांना साधा फेरफार करायला महिनोन्महिने फिरावे लागते, पण येथे काही दिवसांत सर्व प्रक्रिया पूर्ण झाली. यामागे कोणाचा दबाव किंवा संगनमत आहे का, याची सखोल चौकशी झाली पाहिजे. दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झाली पाहिजे, असे शेतकरी नेते राजाराम पाटील यांनी म्हटले.

# केएल २ परिसरातील कचरा, ड्रेनेज समस्या मार्गी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक ८ मधील के.एल.२ सेक्टर ५ परिसरात कचरा साचणे तसेच ड्रेनेज लाईन बंद होण्याच्या समस्येमुळे रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी नगरसेवक रामदास शेवाळे यांच्याकडे निवेदन देऊन तक्रार नोंदवली.



नागरिकांच्या अडचणीची गंभीर दखल घेत नगरसेवक शेवाळे यांनी तात्काळ पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. त्यांच्या पुढाकारामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता के.एल.२ परिसरात स्वच्छता मोहीम राबवली तसेच ड्रेनेज लाईन दुरुस्तीचे कामही तत्काळ सुरू करण्यात आले. सध्या या भागात साफसफाई आणि ड्रेनेज दुरुस्तीची कामे वेगाने सुरू असून त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक शेवाळे यांच्या तत्परतेचे कौतुक करत मनापासून आभार व्यक्त केले आहेत. या तातडीच्या कारवाईमुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यास मदत होणार असून भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने नियमित देखरेख ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी नगरसेविका ममता म्हात्रे सक्रिय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीत सामान्य कर्करोगांचे पूर्व-तपासणी, लवकर निदान, प्रतिबंध व जनजागृती कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई व पनवेल महानगरपालिका यांच्यात विशेष करार करण्यात आलेला आहे.

या कराराअंतर्गत आरोग्य यंत्रणा बळकट करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व समुदाय स्तरावर कर्करोग तपासणी सेवा सक्षम करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई (प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी सर्व्हिसेस, खोपोली) व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने "सामान्य कर्करोगांचे प्रतिबंध, नियंत्रण व लवकर निदान" या विषयावर एएनएम व स्टाफ नर्सेससाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा दोन टप्प्यांत यशस्वीरीत्या पार पडली.




## पनवेलमध्ये कर्करोग प्रतिबंध मोहिमेला वेग

ही कार्यशाळा २५ व २७ मार्च तसेच १६ व १७ एप्रिल २०२६ रोजी सिडको समाज केंद्र, कामोठे येथे आयोजित करण्यात आली होती. एकूण १२० नर्सेस व आरोग्य कर्मचाऱ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला.

कार्यशाळेमध्ये स्तन, गर्भाशय मुख (सर्व्हिकल) व तोंडाचा (ओरल) कर्करोग यांचे प्रमाण, जोखमीचे घटक, लक्षणे, तपासणी पद्धती व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच एचपीव्ही डीएनए चाचणी, पॅप स्मीअर, VIA तपासणी यांचे प्रात्यक्षिक सत्र घेण्यात आले. स्तन स्वयं-परीक्षण, तोंडाच्या कर्करोग तपासणी, तंबाखू निर्मूलन समुपदेशन व जनजागृती यावरही भर देण्यात आला.

कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्यासह कार्यशाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी आशा सेविका व नर्सेस यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व प्रशिक्षणाचा आढावा घेतला.

त्यांनी पुढे नमूद केले की, केंद्र व राज्य सरकार महिला आरोग्य, सक्षमीकरण व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांवर विशेष भर देत असून त्याच धोरणाच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका प्रभावीपणे कार्य करत आहे.

यापूर्वी आशा कार्यकर्त्यांचेही प्रशिक्षण घेण्यात आले असून आता प्रशिक्षित नर्सेस व आशा सेविकांच्या संयुक्त प्रयत्नातून नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (UPHC) स्तरावर कर्करोग तपासणी शिबिरे अधिक प्रभावीपणे आयोजित करण्यात येणार आहेत.

पनवेल महानगरपालिका सर्व नागरिकांना आवाहन करते की, या तपासणी शिबिरांमध्ये सहभागी होऊन आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी.

कार्यशाळेतील सहभागी नर्सेसनी या प्रशिक्षणामुळे कर्करोगाच्या लवकर निदानाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाल्याचे सांगितले व समुदायामध्ये जनजागृतीसाठी सक्रिय भूमिका निभावण्याचा निर्धार व्यक्त केला. पनवेल महानगरपालिका भविष्यातही नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी कटिबद्ध राहील.

**महिलांचे आरोग्य हे समाजाच्या सुदृढ भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून आम्ही प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, लवकर निदान आणि जनजागृती यावर आधारित उपक्रम प्रभावीपणे राबवत आहोत. प्रत्येक महिलेला वेळेवर तपासणी व योग्य मार्गदर्शन मिळावे, हा आमचा मुख्य उद्देश आहे.**

**-ममता म्हात्रे, सभापती, महिला बालकल्याण समिती**

# उन्हात निर्माण होणाऱ्या धुळीच्या भोवऱ्यांमुळे अपघाताची शक्यता



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून दुपारच्या वेळेस प्रचंड उकाडा जाणवत आहे. यातच रसायनीत शनिवार दिनांक २५ रोजीचे दुपारचे तापमान ४२ अंश झाल्याने रसायनी करांच्या अंगाची लाही लाही झाली. या रणरणत्या उन्हामुळे परिसरात वारंवार वावटळी (धुळीचे भोवरे) निर्माण होत असून अपघातांचे केंद्रबिंदू ठरत आहेत. त्यामुळे शेतकरी, मजूर प्रवासी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दुपारच्या सुमारास अचानक उठणाऱ्या या वावटळींमुळे शेतातील मोकळी माती उडून मोठ्या प्रमाणात धुळीचे भोवरे तयार होतात.हे भोवरे काही क्षणांतच तीव्र रूप धारण करून आसपासच्या परिसरात पसरतात. परिणामी, शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना मोठा धोका निर्माण होत आहे. शेतातील कामांदरम्यान अचानक येणाऱ्या वावटळींमुळे अनेकांना तोल जाऊन पडण्याच्या घटना घडत आहेत. काही ठिकाणी शेतीसाठी वापरण्यात येणारी हलकी साधने, प्लास्टिक साहित्य किंवा टिनचे डबे हवेत उडून अपघात घडवत आहेत. तसेच, धुळीच्या तीव्र झोतामुळे काही वेळेस दृष्टी कमी होत असल्याने दुचाकीस्वार आणि वाहनचालकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# ज्योती पाटील, प्रदीप म्हात्रे यांना पुरस्कार

**उरण : बातमीदार**

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट दादर, मुंबई यांच्यातर्फे २४ एप्रिल २०२६ रोजी संस्थेचा १३५वा वर्धापन दिन छबीलदास हायस्कुल दादर मुंबई येथे साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उपमहापौर संजय घाडी,मुकुंद चितळे,देवचंद राका आदी मान्यवर उपस्थित होते.विविध मान्यवर व संस्थेचे सर्व पदाधिकारी,मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.



कै.गो.ना.अक्षीकर विद्यासंकुलातील ज. ए. इ ची इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा, उरणच्या मुख्याध्यापिका ज्योती पाटील यांना आदर्श मुख्याध्यापिका,तर एन.आय.हायस्कूल मधील वरीष्ठ लिपिक प्रदिप म्हात्रे यांना शाळेकरीता विद्यार्थ्यांकरीता उत्तम कामगिरी केल्या बद्दल आदर्श पुरस्कार देण्यात आले.ज्योती पाटील यांना आदर्श मुख्याध्यापिका तसेच वरिष्ठ लिपिक प्रदीप म्हात्रे यांना आदर्श पुरस्कार मिळाल्याने या दोघांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.मुख्याध्यापिका ज्योती पाटील तसेच वरिष्ठ लिपिक प्रदीप म्हात्रे त्यांनी शिक्षण क्षेत्रात बजावलेल्या महत्वाच्या सेवे बद्दल, उत्तम कामगिरी बद्दल त्यांना हा पुरस्कार मिळाल्याने विद्यार्थी, पालकांमध्येही आनंदाचे वातावरण आहे.

# बामणडोंगरीच्या सुकन्येला पुरस्कार व डॉक्टरेट पदवी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बामणडोंगरी तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील रहिवाशी आणि सिडको महामंडळातील वरिष्ठ निवृत्त अधिकारी पद्माकर गणपत नाईक यांची सुकन्या डॉ.पल्लवी दिपक म्हात्रे यांना भारत सरकारच्या निती आयोग मान्यता प्राप्त ' वर्ल्ड कल्चर अँड एन्व्हायरमेंट प्रोटेक्शन कमिशन ' या दिल्ली स्थित प्रतिष्ठित संस्थेमार्फत डॉक्टरेट पदवी आणि साहित्य सेवा रत्न पुरस्कार २०२६ नुकताच प्रदान करण्यात आला.



सिडको महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता एक अभिमानाची गोष्ट असून त्यांच्या कार्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात येत असल्याची प्रतिक्रिया निवृत्त कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. डॉ. पल्लवी म्हात्रे यांनी पुस्तके लिहिली असून लेखिका व कवयित्री असणाऱ्या डॉक्टर पल्लवी म्हात्रे यांच्या साहित्यिक सेवेबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सिडको महामंडळामध्ये वरिष्ठ अधिकारी पदावर काम करून सेनिववृत्त झालेले अधिकारी पद्माकर नाईक यांच्या त्या कन्या असून त्यांचे सिडकोतील निवृत्त कर्मचारी व महामंडळातील इतर अधिकारी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ व प्रतिष्ठितांनी हार्दिक अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# लिपिक ज्योती म्हात्रे सेवानिवृत्त

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलातील हिंदी माध्यमिक विभागाच्या लिपिक ज्योति शंकर म्हात्रे यांनी या ३१ वर्षाची प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निरोप समारंभ सुधागड विद्या संकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने शनिवारी सुधागड संकुलातील सभागृहात आयोजित केला होता.

यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून ज्योती म्हात्रे यांना भावपूर्ण निरोप समारंभ देण्यात आला. यावेळी त्यांच्या भावी निवृत्तीच्या आयुष्याला सर्वांनी आपल्या मनोगतातून हार्दिक शुभेच्छा दिल्या.

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली विद्यालयातील हिंदी माध्यमिक विभागात कार्यरत असलेल्या ज्योती शंकर म्हात्रे या वयाच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. ३१ वर्षाची विद्यालयातील प्रदीर्घ सेवा मनोभावे आणि शिस्तप्रिय वातावरणात पूर्ण केली आहे. त्यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन केले होते.



# कोपर शाळेत प्रवेशोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील राजिप शाळा कोपर येथे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव अतिशय उत्साही व आनंदी वातावरणात झाला. या कार्यक्रमासाठी शाळेचे चेअरमन अनंत ठाकूर, माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, कांबळे गुरुजी, भाऊ भोईर, ॲड. रूपेश म्हात्रे, काशिनाथ पाटील, अनुसया घरत, इंदुबाई म्हात्रे यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून अकोला जि प चे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी रूपसिंग बागडे उपस्थित होते.

यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून मंगलमय वातावरणात स्वागत करण्यात आले तसेच रूपसिंग बागडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तू दिल्या. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका पेणकर मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

# हंगामा हो गया...

## बिंदू ८५ वर्षांची झाली







झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

सत्तरच्या दशकात मी शाळेत असतानाचा विनोद ( आता त्यावर हसता येणार नाही. वेगळ्या अर्थाने हसाल ),

गणिताचे शिक्षक प्रश्न विचारतात , रेषा आणि बिंदू यात फरक काय ?

एक हुशार विद्यार्थी पटकन उत्तर देतो, एक नायिका तर दुसरी खलनायिका ( रेषाऐवजी रेखा असं घ्यायचं).

सत्तरच्या दशकातील अनेक मसालेदार मनोरंजक चित्रपटात बिंदूने कपटी, कारस्थानी, खुनशी, अशाच भूमिका अनेकदा डोळे वटारुन साकारल्या. त्या इतक्या आणि अशा जहाल असत की, राज खोसला निर्मित आणि दिग्दर्शित दो रास्ते (१९६९) या चित्रपटाची नायिका मुमताज बिंदीया चमकेगी वगैरे गाण्यात ठुमके लावण्यात, ठसकेबाज नृत्यात लक्ष वेधून घेत होती तरी नीला या अतिशय महत्वाकांक्षी, धूर्त , बेपर्वा, चाणाक्ष व्यक्तीरेखेत बिंदूच जास्त भाव खाऊन गेली. प्रेम चोप्राची भांडकुदळ पत्नीची ही भूमिका गाजली. आणि मग प्रेम चोप्रासोबत अनेक चित्रपटांत चांगल्या गोष्टीत विष पेरण्याचे, विघ्न घालण्याचे चांगले काम तिने रंगवून खूलवून केले. विशेषतः तिची जालीम नजर, चेहऱ्यावरचे कपटी कारस्थानी भाव आणि बोलण्याची विशिष्ट शैली यातून अनेकदा तरी ती भाव खाऊन जाई. या व्यक्तीरेखाना त्या काळात निगेटिव्ह भूमिका म्हणत. आपण कधी दिलीपकुमारसोबत काम करु असे तिला स्वप्नातही वाटलं नव्हतं, पण तरीही तिला तो योग आला आणि तिने आपल्याला कसंही करुन दिलीपकुमारसोबत काम करायला मिळू देत असं वाटत असलेल्या शर्मिला टागोरवर तिने सहज मात केली. तो चित्रपट होता,

बी. आर. चोप्रा निर्मित आणि दिग्दर्शित दास्तान "(१९७२) . या चित्रपटातील दुहेरी भूमिकेतील दिलीपकुमारपैकी एकाची बदफैली आणि आपल्या मित्रासोबत ( प्रेम चोप्रा) रंगलिया उडवणारी पत्नी तिने एकदम कडक साकारली. हा अभिनय वाटू नये असा हा जबरा परफॉर्म्स होता. ही व्यक्तीरेखा केवळ आणि केवळ बिंदूच साकारु शकते असे म्हणावे लागले. हा चित्रपट समीक्षक आणि रसिक अशा दोघांनीही नाकारला, पण बिंदू लक्षात राहिली. मुझ जैसी औरत इस दुनिया मे न हो तो अच्छा हो हा बिंदूचा संवाद गाजला.

अशी बिंदू १७ एप्रिल रोजी चक्क पंचाऐंशी वर्षांची झाली. तिचा जन्म १७ एप्रिल १९४१चा. गुजरातमधील बलसाडजवळील एका गावात गुजराती कुटुंबात तिचा जन्म झाला. वडिल नानकभाऊ देसाई हे चित्रपट निर्माते आणि आई ज्योत्स्ना नृत्य कलाकार. बिंदू सर्वात मोठी, तिला पाच बहिणी आणि एक भाऊ. पण लहानपणी चित्रपट पाह्यची परवानगी नव्हती. बिंदू घरी रेडिओवर गाणे ऐकून नृत्य करत असे. ती भरतनाट्यम आणि कथ्थक नृत्य शिकली आणि हे कुटुंब मुंबईत राह्यला आले. नृत्य शिक्षणाने आपण चित्रपटांतून भूमिका साकाराव्यात असं तिला वाटतं होतं. अरुणा इराणी तिची मावस बहिण.

अशातच बिंदूच्या वयाच्या तेराव्या वर्षी तिच्या वडिलांचे निधन झाले. वडिलांची इच्छा मात्र तिने डॉक्टर व्हावं अशी होती.

बिंदूला वयाच्या तेराव्या वर्षी म्हणजे १९५९ साली संतान या चित्रपटात नायिका कामिनी कदम हिच्या लहान बहिणीची भूमिका मिळाली. या चित्रपटात राजेंद्रकुमार नायक आहे. पाठोपाठ एक फुल चार काँटे या चित्रपटात अगदीच किरकोळ भूमिका मिळाली. मोहनकुमार दिग्दर्शित अनपढ (१९६२) मध्ये रुपेरी पडद्यावर जीया ले गयो रे मेरा हे गाणे साकारण्याची संधी मिळाली. या काळात तिचे आणि चंपकलाल झवेरी यांचा परिचय झाला, त्यांची बहीण बिदूची मैत्रीण होती, त्यातून हे सगळे घडलं आणि मग त्यांचे १९६४ लग्नही झाले. चंपकलाल झवेरी यांनी बिंदूच्या कुटुंबातील एक होणं पसंत केले आणि अशातच एकदा ते त्यांचा परिचय असलेल्या अभिनेता चंद्रशेखर यांच्या एका पार्टीत आपली पत्नी बिंदू आणि तिची बहीण जया यांना नेले असता तेथे संगीतकार लक्ष्मीकांत ( प्यारेलाल यांचे सहकारी) यांची जयाशी ओळख झाली आणि काही काळाने त्यांचे लग्नही झाले. अशातच काही दिवसांनी लक्ष्मीकांत यांना आपल्या पत्नीसह बिंदूनी आपल्या घरी जेवायला बोलावले असता बहिण आली पण लक्ष्मीकांत यांना यायला उशीर का होतेय हे पाहण्यासाठी बिंदू आपल्या वांद्र्यातील घराजवळ असलेल्या मेहबूब स्टुडिओतील रेकार्डिंग स्टुडिओत गेली. तेथे लक्ष्मीकांत प्यारेलाल हे राज खोसला दिग्दर्शित अनिता या चित्रपटाच्या पार्श्वसंगीतावर काम करत होते. बिंदूला पाहताच राज खोसला यांनी लक्ष्मीकांत यांना विचारले, ही कोण? ते म्हणाले, माझी मेव्हणी. राज खोसला म्हणाले, माझ्या पुढच्या चित्रपटात ती भूमिका करेल काय? नकारात्मक शेडची आहे. लक्ष्मीकांतजी म्हणाले, तिलाच विचारा. बिंदूच्या मनात आपण नायिका व्हावे असे होते आणि थोडेफार मॉडेलिंग करून मुद्रित माध्यमातील जाहिरातीसाठी फोटो सेशन) तिची वाटचाल सुरू होती. राज खोसला यांनी बिंदूला आपल्या आगामी चित्रपटाबाबत कल्पना दिली. चंद्रकांत काकोडकर यांच्या निलाबरी या कादंबरीवर आधारित आपण दो रास्ते " हा चित्रपट निर्माण करत आहोत. या चित्रपटात राजेश खन्ना आणि मुमताज नायक नायिका आहेत. नीला ही एका एकत्र कुटुंबात भांडणे लावते, तीन भावांमध्ये फूट पाडते. या चित्रपटाच्या कथेची नायिका नीला" आहे. आणि प्रेम चोप्रा पतीच्या भूमिकेत आहे. लक्ष्मीकांत आणि बिंदू यांनी सांगितले, आम्ही आठ दहा दिवसांत विचार करून काय ते सांगतो. आठवडाभरानंतर लक्ष्मीकांतजी म्हणाले, एक चित्रपट करायला काय हरकत आहे? राज खोसला यांनी बिंदूची स्क्रीन टेस्ट करायचे ठरवले. आणि त्यासाठी त्यांनी बिंदूला आपल्या चिराग या चित्रपटाच्या सेटवर बोलावले. तेव्हा महेश भट्ट राज खोसलाकडे सहाय्यक दिग्दर्शक होते. त्यांनी बिंदूला चिराग या चित्रपटातील आशा पारेखचे काही संवाद बोलायला सांगितले. बिंदूने त्यात छान रंग भरला आणि तिची निवड झाली.

राज खोसला दिग्दर्शित चित्रपटात भूमिका म्हणजे अन्य दिग्दर्शकांचे लक्ष आपोआपच त्या कलाकाराकडे जाणार. नतिजा या चित्रपटात बिंदूला चक्क विनोद खन्नाची नायिका साकारायला मिळाली. हा चित्रपट कृष्ण धवल अर्थात ब्लँक अ‍ॅण्ड व्हाईट होता. बी. आर. फिल्म निर्मित आणि यश चोप्रा दिग्दर्शित इत्तेफाक मध्ये राजेश खन्ना, नंदा, सुजीतकुमार यांच्यासोबत छोटी भूमिका मिळाली. हे तीनही चित्रपट १९६९ साली प्रदर्शित झाले. इत्तेफाक हिट झाला. दो रास्ते सुपर डुपर हिट ठरला आणि बिंदू नावाचे एक भन्नाट पर्व सुरू झाले. या चित्रपटातील बिंदूच्या अदाकारीचे या चित्रपटाच्या मेट्रो चित्रपटगृहातील प्रीमियरपासूनच कौतुक सुरु झाले आणि चित्रपटाने ऑपेरा हाऊस चित्रपटगृहात पन्नास आठवड्याचा मुक्काम करताना चित्रपटसृष्टी, चित्रपट रसिक आणि प्रसार माध्यमांचे बिंदूकडे लक्ष लागले. शक्ती सामंता यांनी आपल्या दिग्दर्शनातील कटी पतंग मध्ये प्यार से लोग मुझे शब्बो कहते है या आक्रमक क्लब डान्स ( की कॅब्रे?) आणि काही नाट्यमय दृश्यांची भूमिका दिली. ही भूमिका आपण स्वीकारावी की नाही असा बिंदूला प्रश्न पडला होता. कारण, नृत्य गीतासाठी बिनधास्त लूक हवा होता. बिंदूने आपले पती चंपकलाल झवेरी यांच्याशी चर्चा केली आणि मग होकार दिला. हा चित्रपट आणि ही भूमिका सुपर डुपर हिट ठरले आणि बिंदूकडे खरोखरच चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शकांची रांग लागली. ती चित्रपट स्वीकारत होती तरी तिच्या मनात आपण नायिका व्हावे हेच होते. त्या दिवसांत मीनाकुमारीचाच मेकअपमन बिंदूचाही अधूनमधून मेकअप करे. मीनाकुमारीने बिंदूला चांगला सल्ला देत म्हटले, सध्या चित्रपटात नकारात्मक भूमिकेचा स्लॉट खाली आहे. त्याचा तुला फायदा होईल. बिंदूने हा सल्ला मानला आणि मग त्या पठडीतील अनेक भूमिका स्वीकारल्या. अमर प्रेम , नेहले पे देहला, दस नंबरी, शंकर शंभू, जोशीला, प्रेम नगर, इम्तिहान, प्रेम शास्त्र, मेरे जीवन साथी, गहरी चाल , नफरत, त्याग, चलता पुर्जा, अशा अनेक चित्रपटांत तिला भूमिका मिळाल्या. दुलाल गुहा दिग्दर्शित दुश्मन (१९७२) या चित्रपटात राजेश खन्नासोबत सच्चाई झुक नहीं सकती असं कोठीवरचे नृत्य गीत मिळाले. सावनकुमार निर्मित आणि दिग्दर्शित हवस या चित्रपटात तिला अतिशय धाडसी व्यक्तीरेखा साकारायला मिळाली. बिंदूशिवाय या भूमिकेसाठी अन्य कोणाचाही या भूमिकेसाठी विचार करता येणार नाही असे कौतुकाने म्हटले गेले.

या चित्रपटातील तिने पडदाभर साकारलेल्या अपने दिल में जगा दिजीए या गाण्यातील तिचं कमालीचं मोहक, मादक, मधाळ रुप भन्नाट आहे.

बिंदू म्हणजे रुपेरी पडद्यावरील एक जहाल व्यक्तीमत्व. कोणतीही सभ्यता, परंपरा, मूल्य न पाळणारी असे काहीसे होते. प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर (१९७३) क्रूरकर्मा तेजा ( अजित) ची मोना डार्लिंग तिने भारी रंगवली. दिलजलो का दिल जलाके असं क्लब डान्स गीतही भन्नाट साकारले.

सत्तरच्या दशकात अनेक चित्रपटांत बिंदू हमखास पाहायला मिळे. वितरकांची तशी मागणीच असे म्हणे. हेदेखील एक प्रकारचे यशच. एस. के. कपूर निर्मित आणि चांद दिग्दर्शित धर्मा (१९७३) चित्रपटातील प्राणसोबतची तिची राज की बात कह दू तो ही कव्वाली सुरु होताच पब्लिक पडद्यावर पैसे उडवत असे अप्सरा थिएटरमध्ये घडत असे. विशेष उल्लेखनीय गोष्ट, धर्मा प्रदर्शित झाला तेव्हा वृत्तपत्रात नवीन निश्चल, रेखा याची नावे सुरुवातीला असत. ही कव्वाली सुपर डुपर हिट होताच प्राण, अजित, बिंदू यांची नावे अगोदर येऊ लागली.

हृषिकेश मुखर्जी यांनी आपल्या दिग्दर्शनातील अभिमान, चैताली, अर्जुन पंडित या चित्रपटात बिंदूला तिच्या भडक इमेजपेक्षा वेगळ्या दिलेल्या भूमिकाही तिने रंगवल्या. तात्कालिक समिक्षकानी या गोष्टीची दखल घेतली. एक दोन साऊथ इंडियन चित्रपटात तिने भूमिका साकारली. माफीचा साक्षीदार (१९८६) या मराठी चित्रपटात तिचा जीवन में आयी नशा या गाण्यावर भन्नाट क्लब डान्स आहे.

सत्तरच्या दशकाच्या अखेरीस बिंदूचा प्रभाव ओसरला. आग शांत होत गेली. ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीला सुभाष घई दिग्दर्शित हीरो (१९८३) पासून बिंदूने कधी मूळ स्वरूपानुसार पण कौटुंबिक रुपात, तर कधी चक्क विनोदी भूमिकेत ( शोला और शबनम) काम केले.

बिंदूची जागा घेता येणे शक्य नव्हते. ती घातक नजर आणणार कुठून?

बिंदूने राजश्री प्रॉडक्शनच्या सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित हम आपके है कौन (१९९४) मधील भूमिका एन्जॉय केली. अधूनमधून एखाद्या चित्रपटात ती दिसे. मेहुलकुमार दिग्दर्शित क्रांतीवीर (१९९४) च्या फिल्मालय स्टुडिओतील सेटवर आम्हा सिनेपत्रकाराना शूटींग रिपोर्टींगसाठी आमंत्रित केले असता नाना पाटेकर आणि बिंदू यांच्यावर क्लब गीत नृत्याचे चित्रीकरण सुरू होते, असं लाईव्ह कव्हरेज म्हणजे आम्हा सिनेपत्रकाराना जणू खुराकच. दोघेही एकदम भारी आणि फॉर्मात होतेच. याच वेळी बिंदूच्या अतिशय दिलखुलास मुलाखतीचा योग आला. यादगार पल ठरला.

नवीन शतकात सुरुवातीपासूनच चित्रपटसृष्टी बदलत गेली, एव्हाना निर्माता, दिग्दर्शक, कलाकार यांची बरीच पुढची पिढी आली होती, बिंदूला त्यात तसं स्थान नव्हते. फराह खानने ओम शांती ओम (२००६) या चित्रपटात तिला एक भूमिका दिली. बिंदूचा चार्म हरवला होता. मेकअपचा थर जाणवत होता. बिंदूने चित्रपटसृष्टीपासून दूर जाणं पसंत केले. पूर्वी निदान फिल्मी पार्टीत दिसायची, आता तेही नाही.

चित्रपटसृष्टी कोणासाठी थांबत नाही. नवीन पिढीसाठी बिंदू मागील काळात जमा झाली होती. माझी पिढी यू ट्यूबवर अनहोनी चित्रपटातील हंगामा हो गया पाहताना जुन्या आठवणीत जाते. सत्तर ऐंशीच्या दशकाच्या फ्लॅशबॅकमध्ये जात.

बिंदूचे आपलं एक व्यक्तीमत्व आहे ( वा होते), आपल्या यशाचे श्रेय ती आपल्या पतीला म्हणजे चंपकलाल झवेरी यांना देते.

तिच्या वाढदिवसानिमित्त तिची आठवण आली म्हणून लिहिले.

---



# चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ आरती प्रभू

चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ आरती प्रभू हे एक मराठी कवी व लेखक होते. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या साहित्यिक कार्याचा घेतलेला आढावा...

चिंतामणी त्र्यंबक खानोलकर यांचा जन्म वेंगुर्ले तालुक्यातील बागलांची राई, तेंडोली येथे झाला. त्यांच्या शिक्षणाची सुरुवात १९३६साली वेंगुर्ले येथून झाली. १९३७साली खानोलकर कुटुंब वेंगुर्ले सोडून सावंतवाडी येथे आले. सावंतवाडी येथील कळसुलकर हायस्कूलमध्ये त्यांनी इंग्रजी पहिली ते इंग्रजी चौथीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यांनतर शिक्षणासाठी खानोलकर मुंबईत ठाकुरद्वार येथे आले व नजीकच्या सिटी हायस्कूलमध्ये इंग्रजी पाचवीत प्रवेश घेतला. साधारण जुलै १९४८मध्ये मॅट्रिकच्या वर्गात असताना शिक्षण अर्धवट सोडून ते तडकाफडकी कुडाळला परतले. कोचरे वेंगुर्ले येथील प्राथमिक शाळेत त्यांनी प्रवेश घेतला व त्यानंतर १९४९ कुडाळ हायस्कूलमध्ये एसएससीच्या वर्गात दाखल झाले.

४ जानेवारी १९५० रोजी त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्याचवर्षी एसएससीच्या वर्गात खानोलकर अनुत्तीर्ण झाले. मे १९५०मध्ये 'बालार्क' या शालेय वार्षिकामध्ये त्यांची 'भवितव्य' ही कविता व 'मोगऱ्याची वेणी' ही कथा प्रसिद्ध झाली. खानोलकरांनी लिहिलेले हे आजवर उपलब्ध असलेले पहिले लिखाण आहे. १ जानेवारी १९५१ कुडाळ येथे ते व त्यांच्या मातोश्री, यांनी 'वीणा गेस्ट हाउस' नावाचे लॉजिंग-बोर्डिंग सुरू केले. तेथे गल्ल्यावर बसून खानोलकर कविता करत. मार्च १९५१मध्ये 'सत्यकथा' ह्या नियतकालिकात त्यांची 'जाणीव' ही कथा प्रसिद्ध झाली. १० मे १९५२ रोजी सुकळवाड, मालवण येथील तारा भास्कर परुळेकर यांच्याशी खानोलकर यांचा विवाह झाला. लग्नानंतर त्यांनी पत्नीचे नाव शैलजा ठेवले. 'वैनतेय' साप्ताहिकामध्ये त्यांची 'कुढत का राहायचे?' ही कविता १७ फेब्रुवारी १९५३ रोजी प्रसिद्ध झाली व पहिल्यांदाच ते कवी म्हणून प्रकाशात आले. २५ एप्रिल १९५३ रोजी त्यांना मुलगा झाला त्याचे नाव त्र्यंबक ठेवले. त्यानंतर २६ जानेवारी १९५४ या दिवशी त्यांच्या 'येईन एक दिवस' या नाटकाचा प्रयोग झाला. रंगभूमीवर आलेले हे त्यांचे पहिलेच नाटक. फेब्रुवारी १९५४मध्ये 'सत्यकथा' नियतकालिकात त्यांची 'शून्य शृंगारते' ही कविता प्रसिद्ध झाली. आरती प्रभू या टोपणनावाने प्रसिद्ध झालेली ही पहिली कविता होती. १ जानेवारी १९५७ या दिवशी त्यांनी आकाशवाणी पुणे केंद्रावरील कविसंमेलनात भाग घेतला हे त्यांचे आकाशवाणीवरील पहिले काव्यवाचन होते.

४ मे १९५८ रोजी मालवण येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात खानोलकरांच्या पल्लवी या संपादित काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. २६ सप्टेंबर १९५९ साली त्यांचा जोगवा हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. १९६१च्या ऑक्टोबर महिन्यात कम्युनिस्ट असल्याच्या आरोपावरून त्यांना आकाशवाणीच्या नोकरीवरून काढण्यात करण्यात आले. 'मौज'च्या अंकात आपल्या कविता प्रकाशित झाल्याचे बघून खानोलकर बावरून गेले. त्या अवस्थेतच त्यांनी खालील कविता लिहिली ये रे घना...

(साभार : विकीपीडिया)

---

# मेळघाट हाट : दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ



अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे.

मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांची कला-कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने येथे सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून, यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

-अपर्णा यावलकर
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती

# पेण नगर परिषदेत दिव्यांगांना निधीचे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी राज्य सरकार विविध योजना राबवित असून याचाच एक भाग म्हणून पेण नगरपरिषदेच्या हद्दीतील २४७ दिव्यांग लाभार्थीना आज प्रत्येकी सात हजार रुपये थेट खात्यात जमा करण्यात आले असून आमदार रविशेठ पाटील नगराध्यक्षा प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील आणि सर्व नगरसेवक नगरसेविका यांच्या उपस्थितीत प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश वाटप आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमास नगरपरिषदेत मोठ्या संख्येने दिव्यांगाची उपस्थिती लाभल्याने सभागृह पूर्ण भरले होते.



यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील आपल्या भाषणात मार्गदर्शन करताना म्हणाल्या की दिव्यांग बांधवांना सुखी समाधानी जीवन जगता यावे यासाठी माझ्या प्रथमतः शुभेच्छा आज दिव्यांग कल्याण निधी वाटप कार्यक्रम उशीराने वाटप झाले असले तरी आता महिलाराज सत्तेत या वर्षी ३ डिसेंबर जागतिक अपंग दिनी आपण या निधीचे वाटप प्रत्येकी दहा हजार रुपयांचा धनादेश देऊन केलं जाईल हा माझा तुम्हाला शब्द आहे. आज आणि उद्या दोन दिवसांत तुमच्या खात्यात प्रत्येकी सात हजार रुपये अपंग कल्याण निधी जमा होईल माझ्या शहरातील प्रत्येक समाज घटकांतील व्यक्तीच्या विकासा बरोबर शहराचा विकास यासाठी मी आणि सहकारी आम्ही सारेजण कटिबद्ध राहून विकासाची कामे करीत आहोत ते आमचं काम आहे रस्त्याची कामे सुरू असून नागरिकांना रहदारी करताना थोडा त्रास होत आहे याची मला जाणीव आहे पण शहरातील विकासकामे मान्सून पुर्व करण्यासाठी विकासाची कामे करणे क्रमप्राप्त आहे. चांगले सुंदर शहर पेण शहर आणि प्रत्येक नागरिकाला सुखी समाधानी जीवनासाठी मूलभूत समस्या निर्माण करणे हेच आमच उदिष्ट, ध्येय असल्याचे शेवटी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले.

पेण नगर परिषद सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले.

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर डंपरचालकांचा उद्दामपणा; वाहने केली रस्त्याच्या मधोमध उभी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

भरावासाठी माती वाहून नेणाऱ्या दोन डंपर चालकांचा आज सकाळी श्रीवर्धन समुद्रकिनारी उद्दामपणा पाहायला मिळाला. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याजवळील मठाच्या स्मशानभूमी जवळ दोन डंपर रस्त्याच्या मधोमध उभे करून डंपर चालक समुद्रकिनाऱ्यावरती निघून गेले होते. त्यामुळे या मार्गावरून येणाऱ्या पर्यटकांना व नागरिकांना आपली वाहने डंपरच्या मागे उभी करून डंपरच्या चालकांचा शोध घेण्याची वेळ आली. आज शनिवार असल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी नेहमीच गर्दी असते. अनेक वॉटर स्पोर्ट्स वाले आपली विविध वॉटर स्पोर्ट्सची साधने घेऊन समुद्रकिनाऱ्यावरती असतात.



अशा मधून एका विकासकाचे काम समुद्रकिनाऱ्याच्या बाजूला सुरू असून त्या ठिकाणी मातीचा भराव करणारे डंपर समुद्रकिनाऱ्यावरील मार्गावरून वाहतूक करण्यात येतात. सदर डंपर चालकांना समुद्रकिनाऱ्यावरून वाहतूक करण्याची परवानगी दिली कुणी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी त्या ठिकाणी ओरडाआरड केल्यानंतर डंपर चालक आले व आपल्या गाड्या घेऊन निघून गेले. ती स्मशानभूमीच्या प्रवेशद्वाराची जागा होती. जर का एखादे मयत त्यावेळी स्मशानभूमीत आले असते तर लोकांना खांद्यावर तिरडी घेऊन उभे राहावे लागले असते.

# यशवंत साबळे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदी

**खोपोली : प्रतिनिधी**

उद्योजकता आणि समाजकार्यात संतुलित व प्रेरणादायी वाटचाल करणारे आदरणीय श्री. यशवंत लक्ष्मणशेठ साबळे यांची रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कार्याध्यक्ष पदावर निवड झाली आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांची, कर्तृत्वाची आणि समाजनिष्ठेची ही निवड गौरवपूर्ण पावती मानली जात आहे.



बांधकाम व कन्स्ट्रक्शन क्षेत्रात ठसा उमटवत त्यांनी उद्योजक म्हणून स्वतःची भक्कम ओळख निर्माण केली आहे. त्याचबरोबर बँकिंग व क्रीडा क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवत विविध घटकांना जोडण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सेवा कार्य राबवत त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे.

भाजप नेते म्हणून जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेत विकासाभिमुख दृष्टीकोनातून कार्य करणारे यशवंत साबळे हे "नावात यश, कर्मात सेवा" या उक्तीला साजेसे व्यक्तिमत्त्व ठरले आहेत.

त्यांच्या निवडीमुळे रायगड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली क्रिकेट क्षेत्राचा विकास होऊन नवोदित खेळाडूंना अधिक संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाला ११२ कोटींचा महाअन्नपूर्णा प्रकल्प मंजूर

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था फिलिपाईन्स यांच्यात झालेल्या आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारामुळे भात शेतीचा कायापालट करणारा आणि राज्यस्तरीय भात विकासवाढीचा ११२ कोटी रुपयांचा ऐतिहासिक ' महाअन्नपूर्णा प्रकल्प १.० ' केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून मंजूर झाल्याने दापोली कृषी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पुढाकाराने हा प्रकल्प तयार करण्यात आला होता.या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, वित्त विभागाचे अतिरिक्त



मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, कृषी प्रक्रिया व नियोजनचे संचालक विनयकुमार आवटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र,कर्जतचे भात विशेषज्ञ व सहयोगी संशोधन संचालक डॉ. बी. डी. वाघमोडे हे आहेत.

राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढीसाठी आणि वातावरणपूरक भात जाती तसेच तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सदर प्रकल्प महाराष्ट्र शासनामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला होता.हा प्रकल्प ५ वर्षांसाठी असून त्यात ६० टक्के केंद्र व ४० टक्के महाराष्ट्र शासनाचा वाटा असणार आहे.

हा प्रकल्प राज्यातील चारही कृषी विद्यापीठाच्या १४ संशोधन केंद्रांवर तसेच भात पिकवणाऱ्या सर्व विभागातील शेतकऱ्यांच्या शेतावर राबविण्यात येणार आहे.याद्वारे शास्त्रज्ञ, विद्यार्थी, शेतकरी व राज्यातील संबंधित संस्था यांना आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था फिलिपाईन्स यांच्याकडून उच्च दर्जाचे प्रशिक्षण, जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ, भात पिकाचे विविध जर्मप्लाझम इ.बाबतीत महत्त्वपूर्ण सहकार्य मिळणार आहे.

राज्यातील भात शेती पावसावर निर्भर असल्याने वारंवार हवामान बदलामुळे पाऊस उशिरा येणे, खंड पडणे, कमी कालावधीत जास्त पाऊस पडणे, तसेच पीक पक्वतेवेळी जास्त पाऊस पडल्याने भात पीक लोळून नुकसान होणे, किडी रोगाचा मोठया प्रमाणावर उद्रेक होणे, भात पुनर्लागवड, कापणी, मळणी इ.कामासाठी मनुष्यबळ वेळेत न मिळणे, यामुळे राज्यातील भात उत्पादनावर मोठा परिणाम होत आहे.कमी उत्पादकतेच्या कारणांमध्ये प्रामुख्याने वेगवेगळी कृषी आधारित परिसंस्था, वरकस, मध्य उंचीच्या आणि पाणथळ जमिनी, यांची आव्हाने आहेत.जसे की, वेळेत भात पुनर्लागवडीसाठी मनुष्यबळ मिळत नसल्याने भात शेतीपडमध्ये वाढ होत आहे.तसेच भात पिकवणाऱ्या भागात पौष्टिकमुल्य योग्य प्रमाणात नसल्याने कुपोषणात वाढ होत आहे.

# गोरेगाव घटनेनंतर संभाजी ब्रिगेडकडून पीडित कुटुंबाची भेट



**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील गोरेगाव येथे घडलेल्या अमानुष अत्याचार व हत्या प्रकरणामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेड रायगड जिल्ह्याच्या वतीने पीडित महिला पल्लवी मोरे यांच्या राहत्या घरी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन करण्यात आले.यावेळी संभाजी ब्रिगेडचे रायगड जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव सुर्वे, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धार्थ गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक धामणसे तसेच आरपीआय श्रीवर्धन तालुका अध्यक्ष विलास चाफे, कोमल गायकवाड, पुई गावचे उपसरपंच त्रुशिकेष दळवी यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.पदाधिकाऱ्यांनी कुटुंबीयांकडून संपूर्ण घटनेची माहिती घेतली व प्रकरणाची सखोल शहानिशा केली. तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा विश्वास देत आर्थिक मदतही करण्यात आली.

यानंतर संबंधित परिसरातील पोलीस चौकीत जाऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. या प्रकरणाची सखोल तपासणी करून आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी, तसेच प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवून दोषीला कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.या वेळी अप्पर पोलिस अधीक्षक अभिजीत शिवतरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बेलदरे यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील बहुजन समाजाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे घवघवीत यश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाने एन.एम.एम.एस.शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आपला शैक्षणिक दर्जा पुन्हा अधोरेखित केला आहे. शुक्रवार दिनांक २४ एप्रिल रोजी या परीक्षेचा निकाल जाहीर झाला.या परीक्षेत विद्यालयातील तीन विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले असून,शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष त्यांनी दिली आहे. शिष्यवृत्ती पात्र ठरलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत श्रवण प्रमोद शिर्के,आर्या दिगंबर पालकर,आयुष प्रवीण म्हस्के



विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत असल्याचे या यशातून स्पष्ट झाले आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक संतोष कदम, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच शिक्षणप्रेमी यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मनापासून अभिनंदन केले. तसेच संस्था अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शाळा समिती अध्यक्ष सुनील पाटील, सामाजिक कार्यकर्ते कृष्णाजी महाडिक व इतर मान्यवरांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिष्यवृत्ती पात्र सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे मान्यवरांनी हार्दिक अभिनंदन केले आहे

# माणगावजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत स्कूटीचालकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

एका भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाची स्कुटी दुचाकीला जोरदार धडक लागल्याने झालेल्या भीषण अपघातात स्कुटी चालकाचा मृत्यू झाला. सदरील अपघाताचा गुन्हा शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १:३० वाजण्याच्या सुमारास माणगाव तालुक्यातील गारळ गावच्या हद्दीत विहान हॉटेल समोर मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्गावर घडला. या अपघाताची फिर्याद योगेश चंद्रकांत लहाने (वय २९ ) रा.गारळ ता.माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

सदर अपघाताच्या गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी कि,या



अपघातातील मयत ज्ञानेश्वर नथुराम लहाने (वय ५० )रा. गारळ ता.माणगाव हा त्याच्या ताब्यातील दुचाकी गाडी मुंबई बाजूकडून गारळ गावाकडे चालवीत जात असताना गोवा बाजूकडून मुंबईकडे जाणाऱ्या कोणत्या तरी अज्ञात वाहनाने स्कुटीला धडक दिली. या अपघातात स्कुटी चालकाचा मृत्यू झाला

# नागाव येथे श्री साई नेत्रालयात मोफत उपचार शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव येथील श्री साई आरोग्य सेवा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने संचालित श्री साई नेत्रालयामध्ये दर महिन्याच्या २३ तारखेला आयोजित करण्यात येणारे मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत पार पडलेल्या शिबिरात सुमारे ६० रुग्णांची मोफत डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच ज्यांना गरज आहे अशा रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

या शिबिरात वैद्यकीय पथकाचे मार्गदर्शन डॉ. हेत किरण मार्माणिया यांनी केले. ऑप्टोमेट्रिस्ट म्हणून कन्से प्रातकी मगत यांनी सेवा बजावली, तर लॅब स्टाफमध्ये दिपेश पाटील व किरण नेमन यांनी आपले योगदान दिले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सुरेश खडपे, डेसमंड हाळे, सुबोध पोसामे, विकास हाळे, अनिल चौलकर, शरद वरसोटकर, प्रकाश पाटील, शिवराम पटेल आणि सुरेश मेहेरे यांनी विशेष परिश्रम घेतले.गरजू नागरिकांनी दर महिना होणार्या या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा,



(छाया : सुधीर नाझरे)



मुरुड : येथील कोळी बांधव आपल्या बोटीतील जाळी पावसाआधी स्वच्छ धुवून कडक उन्हात सुकवण्याचे काम करीत आहेत.

# श्रीवर्धनमध्ये विराट हिंदू संमेलनात महासागर उसळणार; हजारोंच्या उपस्थितीत ऐक्याचा ऐतिहासिक नाद घुमणार

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेचा समृद्ध वारसा जपणाऱ्या श्रीवर्धन नगरीत आता ऐतिहासिक क्षणाची नोंद होणार आहे. सकल हिंदू समाजाच्या एकतेचा, अभिमानाचा आणि संस्कृतीरक्षणाचा संदेश देणारे 'विराट हिंदू संमेलन' अत्यंत भव्य आणि दिमाखदार स्वरूपात आयोजित करण्यात आले असून, या संमेलनाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

"धर्मो रक्षति रक्षितः" या प्रभावी आणि प्रेरणादायी घोषवाक्याखाली होणाऱ्या या संमेलनामुळे श्रीवर्धन शहरासह आजूबाजूच्या गावांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. घराघरांत या कार्यक्रमाची चर्चा सुरू असून, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्व स्तरांतील लोक मोठ्या उत्सुकतेने या दिवसाची वाट पाहत आहेत.

हे भव्य संमेलन सोमवार, दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता, श्री सोमजाईदेवी मंदिराच्या पटांगणात पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी विशेष तयारी करण्यात आली असून, सुंदर व्यासपीठ, आकर्षक सजावट, प्रकाशयोजना आणि शिस्तबद्ध नियोजन यामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढणार आहे.

संमेलनामध्ये विविध क्षेत्रातील नामांकित वक्ते, धर्मगुरू, समाजसेवक आणि विचारवंत उपस्थित राहून हिंदू धर्म, संस्कृती, परंपरा, सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता आणि सध्याच्या सामाजिक आव्हानांवर सखोल मार्गदर्शन करणार आहेत. विशेषतः नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची जाणीव करून देणे आणि समाजात एकोप्याची भावना दृढ करणे यावर भर दिला जाणार आहे.या संमेलनाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणून 'एकसंघ हिंदू समाज' उभारण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे. धार्मिकतेसोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारा हा उपक्रम ठरणार असल्याचेही सांगण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.

# नवी मुंबईत पावसाळापूर्व तयारीला वेग

## नालेसफाई, पंपिंग स्टेशन व आपत्ती व्यवस्थापनावर सर्वानुमते ठराव मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**



आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नाले व गटारे डीसिल्टिंग, पावसाळी पाणी निचरा व्यवस्था, होल्डिंग पाँड व्यवस्थापन, पंपिंग स्टेशनची कार्यक्षमता तसेच आपत्ती व्यवस्थापनाची तयारी यांचा सर्वांगीण आढावा घेण्यासाठी सभागृह नेते सागर नाईक यांनी शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत महत्त्वाचा ठराव मांडला. या ठरावाला सभागृहाने एकमताने मंजुरी दिली असून सदस्यांनी विविध समस्या व उपाययोजना यावर सविस्तर चर्चा केली.

सभागृहात विविध प्रभागातील स्थानिक समस्यांकडे सदस्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. दिघा येथील मुकुंद कंपनी परिसरात दरवर्षी पाणी साचण्याची समस्या गंभीर होत असून, त्या ठिकाणी मोठ्या नाल्याचे डीप क्लिनिंग करण्याची गरज असल्याचे नगरसेवक जगदीश गवते यांनी स्पष्ट केले. ऐरोली परिसरातील होल्डिंग पाँडमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला असल्याचे निदर्शनास आणत सदस्य अशोक पाटील यांनी तो गाळ तात्काळ काढून त्या ठिकाणाचे सुशोभीकरण करण्याची मागणी केली. एमआयडीसी क्षेत्रातील नाल्यांवर स्लॅब टाकून गाळे उभारण्यात आल्यामुळे नालेसफाई कशी होणार, असा सवाल सदस्य सुधाकर सोनवणे यांनी उपस्थित केला. परदेशात पाणी साचत नाही कारण तेथे नियोजनबद्ध व्यवस्था आहे.

नवी मुंबईसारख्या नियोजित शहरातही पाणी साचणे ही गंभीर बाब आहे, असे त्यांनी नमूद केले. विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी ठाणे-बेलापूर मार्गावरील रिलायबल परिसरात पाणी साचण्याच्या समस्येकडे लक्ष वेधत, त्या भागातील रस्त्याची उंची वाढवण्याची गरज व्यक्त केली. तसेच एमआयडीसी डोंगरभागातून येणाऱ्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली.

सभागृह नेते सागर नाईक यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश देताना सांगितले की, “शहरातील सखल भागांची यादी तयार करून कुठे पाणी साचू शकते याचा सविस्तर अहवाल सादर करावा. नालेसफाईनंतर गाळ तत्काळ उचलणे आवश्यक आहे. ‘नाला व्हिजन’ योजनेअंतर्गत होल्डिंग पाँडचा विषय पुढील एक-दोन महिन्यांत सभागृहात मांडण्यात येईल. प्रशासनाने लोकप्रतिनिधीं सोबत प्रत्यक्ष पाहणी करावी.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी सांगितले की, खारफुटीमुळे अडथळा निर्माण होणाऱ्या नालेसफाईच्या कामांना वनमंत्री गणेश नाईक यांच्या पुढाकारानंतर गती मिळाली आहे. खारफुटी स्थलांतरित करून नाल्यांची साफसफाई करणे शक्य होणार आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी ४२ अधिकाऱ्यांसह विविध प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली आहे. एपीएमसी परिसरातील नालेसफाई प्रशासनाकडून न झाल्यास पालिका स्वतः ती करेल. नालेसफाईनंतर गाळ तीन ते चार दिवसांत न उचलल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच धोकादायक इमारती रिकाम्या करण्याची कारवाईही हाती घेतली जाणार आहे.

महापौर सुजाता पाटील यांनी दिघा ते बेलापूर या दरम्यान १५ मे रोजी स्थानिक नगरसेवकांसोबत प्रत्यक्ष पाहणी दौरा करून ऑन-ग्राउंड अहवाल घेण्याचे जाहीर केले. प्रशासनाने सर्व नालेसफाईची कामे गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. या ठरावामुळे पावसाळ्यापूर्व तयारीला वेग येणार असून, शहरातील सखल भागांतील पाणी साचण्याच्या समस्यांवर ठोस उपाययोजना होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# सेंट विल्फ्रेड कॉलेज उपप्राचार्यांवर लाच आणि गैरवर्तनाचा आरोप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

**कडक कारवाईची बजरंग दलाची मागणी**

शेडुंग परिसरातील सेंट बिल्फ्रेड कॉलेजमध्ये घडलेल्या एका प्रकारामुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांनी अनुत्तीर्ण विषय (AIKT) उत्तीर्ण करून देण्यासाठी विद्यार्थिनीकडे बेकायदेशीररीत्या पैशांची मागणी केल्याचा तसेच तिच्याशी अयोग्य वर्तन केल्याचा आरोप समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थिनी विधी शाखेच्या (LLB) प्रथम वर्षात शिक्षण घेत असून, उपप्राचार्यांनी तिचे विषय पास करून देण्यासाठी प्रति विषय ६,००० रुपये अशी लाचेची मागणी केली. यासोबतच त्यांनी विद्यार्थिनीशी वैयक्तिक पातळीवर अनुचित संवाद साधत मर्यादा ओलांडल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

१० एप्रिल रोजी या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले. उपप्राचार्यांनी विद्यार्थिनीला महाविद्यालयाबाहेर बोलावून खोपोली परिसरात नेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे, मात्र विद्यार्थिनीने प्रसंगावधान राखत या घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले असून, तेच या प्रकरणातील महत्त्वाचे पुरावे मानले जात आहेत.

या प्रकाराबाबत विद्यार्थिनीने महाविद्यालय प्रशासनाकडे तक्रार केली होती, परंतु प्रशासनाकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने अखेर तिने पोलिसांत धाव घेतली आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून, संबंधितांवर कायदेशीर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

अशा प्रकारच्या घटनांमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना, लाचेची मागणी निर्माण होत आहे. अशा घटनांना पायबंद बसावा म्हणून आंतरराष्ट्रीय बजरंग दलाने पुढाकार घेतला असून अखिल आर्यंवत संघ-आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष दिनेशदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण प्रांत अध्यक्ष (प्रसिध्दी प्रमुख)राकेश खराडे, रायगड जिल्हा मंत्री जनार्दन मालुसरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी यांनी कडक कारवाईची मागणी केली आहे.

शिक्षण केवळ ज्ञान देण्यापुरते मर्यादित नसून, ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाशी निगडित असते. त्यामुळे अशा गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणात निष्पक्ष आणि कठोर चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई होणे आवश्यक असल्याची भावना बजरंग दलाचे कोकण प्रांत अध्यक्ष राकेश खराडे,रायगड जिल्हा मंत्री जनार्दन मालुसरे, तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी यांनी व्यक्त केली.

प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई होत असून, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या गुरू, शिष्य नात्याला काळिमा फासणारी ही घटना आहे. यावर कठोर कारवाई न झाल्यास भविष्यात पुन्हा अनुचित घटना घडण्याची दाट शक्यता पालक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्याने आंतरराष्ट्रीय बजरंग दल आंदोलनाचा पावित्र्यात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# जागतिक हिवताप दिनानिमित्त मोहोपाड्यात प्रभात फेरी




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक हिवताप दिनानिमित्त मोहोपाडा येथे प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. उपकेंद्र मोहोपाडा व वासांबे यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सकाळी ९ वाजता सुरू झालेल्या या प्रभात फेरीत सुमारे ४० विद्यार्थी व ४ शिक्षक सहभागी झाले होते. तसेच आरोग्य सेवक गणेश भगत, रोशन निंबाळकर, दादासाहेब जगताप तसेच आशा सेविका यांनीही सक्रिय सहभाग घेतला.

“हिवतापाला आळा घाला”, “स्वच्छता ठेवा, डास दूर ठेवा” अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृती केली. फेरीदरम्यान नागरिकांना हिवताप प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश हिवतापासारख्या आजारांबाबत जनजागृती करून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

# श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळा चिरनेर समितीच्या कार्यकारिणीची निवड

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात श्री छत्रपती संभाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. रायगड जिल्ह्यात सर्वात मोठी श्री छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उरणमध्ये छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्ध नौका ग्रुप व ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या माध्यमातून साजरी केली जाते. यंदा १४ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजी महाराजांची ३६९ वी जयंती उरण तालुक्यातील चिरनेर येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

या उत्सवानिमित्त नुकतेच चिरनेर येथे संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत श्री छत्रपती संभाजी महाराज उत्सव समितीची कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सचिन केणी, कार्याध्यक्षपदी योगेश गावंड, उपाध्यक्ष शैलेश चिर्लेकर, सचिव ऋषिकेश कडू, सहसचिव मयुरेश सिंग, समन्वयक महेश केणी, सदस्य पृथ्वीराज कडू, सदस्य जित तांडेल सदस्य आदित्य केणी यांची निवड झाली आहे. श्री छत्रपती संभाजी महाराजांचे विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या या श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळ्याच्या उत्सव समितीच्या विविध पदावर नियुक्ती झालेल्या सर्व पदाधिकारी सदस्यांवर शुभेच्छा व कौतुकांचा वर्षाव होत आहे. हे सर्व पदाधिकारी, सदस्य श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळा साजरी करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

# कामोठे येथे जागतिक मलेरिया दिवस साजरा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**




पनवेल महानगरपालिका अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६,१४,१५ यांच्या मार्फत जागतिक मलेरिया दिवस नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६ कामोठे येथे साजरा करण्यात आला. उपस्थित नागरीकांना मलेरिया आजाराविषयी काळजी कशी घ्यावी त्याच बरोबर उपयोजना काय करता येईल याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे माननीय नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत सर उपस्थित होते तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कामोठे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभवी निंबाळकर, सर्व आरोग्य केंद्राचे कर्मचारी, आशा स्वयंसेविका व पनवेल महानगरपालिका आरोग्य विभागाचे स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मलेरिया आजाराविषयी जनजागृती करिता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

# फॉरेक्स ट्रेंडिंगमध्ये अधिकच्या परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

फॉरेक्स ट्रेंडिंगमध्ये अधिकच्या परताव्याचे आमिष दाखवून चौघांची २८ लाख ४० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी सचिन बापू गुंजाळ (रा. गंगोत्री सोसायटी सेक्टर २१ कामोठे) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

शिवशंकर यादव हे सेक्टर एक, करंजाडे येथे राहत असून त्यांची ओळख सचिन गुंजाळ यांच्याशी झाली. यावेळी फॉरेस्ट ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवून दर महिन्याला परतावा म्हणून चार ते सहा टक्के रक्कम देत असल्याचे समजले. यावेळी त्याने त्याचे फॉरेस्ट ट्रेंडिंगचे खाते दाखवले. त्यावेळी पैसे बुडाले तर लोकांचे पैसे कसे देणार असे विचारले असता त्याच्याकडे भरपूर प्रॉपर्टी आहे ती विकून लगेच तो लोकांचे पैसे देईल असे त्यांनी सांगितले होते. त्यामुळे शिवशंकर यांनी एक लाख रुपये गुंतवले. त्यावेळी दर महिन्याला तो सहा टक्के परतावा देत होता. त्यामुळे शिवशंकर यांनी सहा लाख ८२ हजार रुपये गुंतवले.

मार्च २०२४ पर्यंत नियमित परतावा मिळाला, मात्र त्यानंतर परतावा मिळाला नाही. त्याने वेगवेगळे कारणे सांगितली. त्याला संपर्क केला असता उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्याच्या खारघर येथील कार्यालयाला भेट दिली असता ते ऑफिसही बंद केले होते. अशा प्रकारे शमा परवीन यांची १५ लाख रुपये, सुमित जा यांची पाच लाख ५४ हजार रुपये, विलास कांबळे यांची एक लाख एक हजार रुपयांची फसवणूक केल्याचे त्यांना समजले.

# राष्ट्रीय जनसंपर्क दिनानिमित्त युवकांशी संवाद

**मुंबई : प्रतिनिधी**



आजच्या माहितीच्या युगात जनसंपर्क हा केवळ कॉर्पोरेट संदेशांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो लोकशाहीला बळकटी देणारा 'पाचवा स्तंभ' ठरत आहे, असा सूर पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय) मुंबई चॅप्टरने आयोजित केलेल्या कार्यक्रमात उमटला. राष्ट्रीय जनसंपर्क दिनाच्या निमित्ताने आयोजित या विशेष कार्यक्रमात लोकशाही व्यवस्थेत नैतिक संवादाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

युवा संवाद आणि मार्गदर्शन या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट राष्ट्रीय जनसंपर्क क्षेत्रात तरुण पिढीचा आवाज बळकट करणे हे होते. यावेळी जनसंपर्क क्षेत्रातील दिग्गज, शिक्षणतज्ज्ञ आणि भावी संवादकांनी एकत्र येऊन चर्चा केली. संस्था आणि नागरिक यांच्यातील पारदर्शकता, विश्वास आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी जनसंपर्काची भूमिका कशी महत्त्वाची आहे, यावर वयांनी प्रकाश टाकला.

विश्वासार्हतेची भूमिका कार्यक्रमात समूह चर्चेमध्ये 'साम टी.व्ही.'चे मुख्य संपादक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश खरे आणि डॉ. संजय रानडे यांनी सहभाग घेतला. "फेक न्यूजच्या युगात जनसंपर्क व्यावसायिकांनी सत्याचे आणि विश्वासार्हतेचे रक्षक म्हणून काम करणे आवश्यक आहे. लोकशाही प्रक्रियेत जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी ही भूमिका महत्त्वाची आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी जय हिंद कॉलेज, देवीप्रसाद गोएंका मॅनेजमेंट कॉलेज ऑफ मीडिया स्टडीज आणि मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खुल्या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी कार्यक्रमात रंगत आणली.

यावेळी पीआरएसआय मुंबई चॅप्टरचे सचिव डॉ. मिलिंद आवताडे, सहसचिव प्रा. दैवता पाटील, कोषाध्यक्ष अमलन मस्कारेन्हास, जेनेट अरोले, ब्रज किशोर, सुहास नाईक आणि उपाध्यक्ष राजेश परिदा उपस्थित होते.

# सुक्या मासळीवर बेमोसमी पावसाचे पाणी



**उरण परिसरातील सुक्या मासळीचे दर (प्रती किलो)**

- कोलमाची वडी ५० रुपये (१२ नग)
- जवळा २०० रुपये
- आंबार ४०० रुपये
- दांडी सुकट ४०० रुपये
- बोंबील ४०० ते ७०० रुपये
- वाकट्या २०० ते ५०० रुपये
- माखली १००० रुपये
- पापलेट ६०० रुपये
- कोलंबी सोडे १८०० रुपये

**उरण : रामप्रहर वृत्त**

सोमवारी झालेल्या बेमोसमी पावसाचा सुक्या मासळीवर परिणाम झाला आहे. मासळी वाळविण्यासाठी ठेवली असता ती काही प्रमाणात वाया गेली आहे. त्यामुळे सुक्या मासळीच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

पावसाळ्यात खोल समुद्रातील तसेच खाडीतील मासळीचे प्रमाण कमी होत असल्याने मांसाहार करणारे या कालावधीत सुक्या मासळीवर ताव मारतात. पावसाळा अवघ्या महिन्यांवर येऊन ठेपला असून सुक्या मासळीला मोठया प्रमाणात मागणी वाढली आहे. यामध्ये आंबार, बोंबील जवळा, कोलंबीचे सोडे याला अधिक पसंती दिली जात आहे, मात्र गेल्या काही महिन्यांत मासळीची आवक घटल्याने सुक्या मासळीच्या दरात वाढ झाली आहे. याचा फटका खवय्यांना बसत आहे.

उरण तालुक्यातील करंजा, खोपटे, केळवणे, दिघाटी परिसरात अनेक ठिकाणी मासळी सुकवताना दिसून येते. यामध्ये बोंबील, वाकट्यांसह गावाजवळील रस्त्यावरदेखील लांबलचक पट्ट्यात जवळा सुकवताना दिसून येतो. तर, सध्या रस्त्याच्या कडेला छोट्या टोपल्या मांडून सुकी मासळी विकण्यात येत आहे. यामध्ये सुकी माखली, पापलेट, शिंगाली, बागडे, मांदेलीचा समावेश आहे. तर जवळा, वाकट्या, कोलंबी सोडे, आंबार याला सर्वाधिक पसंती असल्याचे केळवणे येथील मासळी विक्रेती समीरा पाटील हिने सांगितले.

# चिरनेर अक्कादेवी कातकरी वाडीतील कुटुंबियांना धान्य साठवण टाक्यांचे वाटप

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



उरण तालुक्यातील करंजा-कोंढरी येथील शिक्षण प्रेमी दिनेश नारायण म्हात्रे आणि स्नेहबंध समूह उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकताच उरण तालुक्यातील चिरनेर अक्कादेवी कातकरीवाडी येथे आदिवासी कुटुंबाना धान्य साठवण टाकीचे वाटप करण्यात आले.

सामाजिक कार्याचे दातृत्व जपण्यासाठी एकत्र आलेल्या स्नेहबंध समूहाचा काल २३ एप्रिल रोजी वार्षिक गेट-टुगेदर मेळावा चिरनेर येथील ऐतिहासिक भूमित आक्कादेवीच्या निसर्गरम्य माळरानावर झाला. या वार्षिक कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप, आदिवासी बांधवांना धान्य साठवण टाकीचे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना स्नेह भोजन आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

समाजाच्या उन्नतीसाठी आपल्या उत्पन्नाचा एक वाटा समाजासाठी अर्पण करावा, ही संकल्पना प्रत्यक्षात राबविणाऱ्या दिनेश म्हात्रे आणि स्नेहबंध समूहाचे मच्छिंद्र म्हात्रे यांनी कौतुक केले. मानवी जीवन हे एखाद्या वृक्षा प्रमाणे परोपकारी झाले पाहिजे.यासाठी प्रत्येकाने धडपडत रहावे, असे आवाहनदेखील उरण कोमसापचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी प्रास्ताविकेतून केले. तर सुरुवातीलचा शाळेचे मुख्याध्यापक विश्वनाथ पाटील उपस्थितांचे स्वागत केले.स्नेहबंध समूहाच्या वार्षिक मेळाव्यात मी काही क्षण जोडलो गेलो.हे क्षण माझ्या साठी केवळ क्षण नसून गुरुजणांचे आशीर्वाद आहेत.

हे आशीर्वाद मला सामाजिक कार्यासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरतील, असे गौरवोद्गार शेवटी दिनेश म्हात्रे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघा उरण तालुका अध्यक्ष महेंद्र गावंड, उरण शिक्षक पतपेढीच्या संचालिका शर्मिला गावंड, चिरनेर ग्रामपंचायत उपसरपंच दीपक कातकरी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक केशव गावंड, विकास पाटील, मनोहर वर्तक, दिशा तांडेल प्रमिला गावंड, संगिता गावंड प्रतिभा लहाशे संगिता म्हात्रे, प्रतिभा पाटील, संपदा चव्हाण, विनिता पाटील, पांडूरंग ठाकूर, अखिलेश ठाकूर,अनिकेत नाईक, भारती बगाटे, जलतरणपटू मयंक म्हात्रे आदी उपस्थित होते.

# मुरुड-जंजिरा जेट्टी ते होमस्टे पर्यटन; कोळी समाजाला आधुनिक सुविधा मिळणार -मंत्री राणे

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड-जंजिरा परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आणि कोळी समाजासाठी आधुनिक सुविधा आणि पर्यटनाला चालना देणारा व्यापक आराखडा तयार करण्यात आला आहे. मासेमारीपासून पर्यटनापर्यंत विविध क्षेत्रांचा समतोल विकास साधण्यावर भर देत स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत मुरुड-जंजिरा नगरपरिषद हद्दीतील विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.कोळी समाजाचे नेते ह्या प्रकल्पाचा कोळी महिला व युवान फायदा व्हावा म्हणून अनेक वर्ष प्रयत्न करत आहे ,त्यांना संपूर्ण कोळी समाजाने चांगली साथ दिली आणि आज प्रकल्प पुंर्ण होण्यासच पहिले



पाऊण पडल्याने कोळी समाज खुश आहे

मुरुड-जंजिरा हा पर्यटन आणि मच्छीमारांचा परिसर म्हणून ओळखला जातो. या परिसराचा सर्वांगिण विकास करताना पारंपरिक मासेमारी व्यवसाय करणाऱ्या कोळी समाजाच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनाआवश्यक असलेल्या आधुनिक सुविधा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये जेट्टी उभारणी, बर्फगृहे (कोल्ड स्टोरेज), मासळी साठवण केंद्रे, तसेच बोट दुरुस्ती सुविधा यांचा समावेश आहे. या उपाययोजनांमुळे मच्छीमारांचे दैनंदिन काम सुलभ होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी मुरुड-जंजिरा परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने अधिक विकास करण्यावरही भर देण्यात आला आहे. कोळी संस्कृती जपत बॅकवॉटर प्रकल्प, होमस्टे, स्थानिक खाद्यपदार्थ, बोटिंग यांसारख्या उपक्रमांना चालना दिली जाणार आहे. यामुळे पर्यटकांना आकर्षित करण्याबरोबरच स्थानिक

युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पर्यटन आणि मत्स्य विभाग यांच्या समन्वयातून या योजना प्रभावीपणे राबवण्यात येणार असून, विकास प्रक्रियेत स्थानिकांचा सक्रिय सहभाग वाढवण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे. त्यामुळे मुरुड-जंजिरा केवळ पर्यटनाचे केंद्र न राहता, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि आत्मनिर्भर भाग म्हणून विकसित होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या बैठकीला मत्स्य आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, पर्यटन सचिव संजय खांदारे, मुरुडच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर, मुख्याधिकारी सचिन बच्छाव तसेच जय भवानी मच्छिमार संस्थेचे चेअरमन प्रकाश सर पाटील व मच्छीमार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# गोरेगावातील जनआक्रोश मोर्चा स्थगित; २ मेपर्यंतची मुदत

## लोणेरे हत्येप्रकरणी आरोपीस अटक करण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्यासाठी दिला अल्टिमेटम

**माणगाव : प्रतिनिधी**

लोणेरे येथील लॉजवर झालेल्या तरुणीच्या निर्घृण हत्येप्रकरणी अद्यापही आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर ता. २५ एप्रिल रोजी लोणेरे व गोरेगाव बंद ठेवत सर्व पक्षीया कडून जन आक्रोश मोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आले होते. या हत्या प्रकरणी आरोपीला दोन दिवसात अटक करू अशी ग्वाही रायगड पोलिस प्रशासनाने गोरेगाव येथे येऊन सर्वपक्षीय आंदोलनकर्त्यांना दिली. त्यानंतर पोलिसांना सहकार्य करण्याच्या भूमिकेतून हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती शिवसेना शिंदे गटाचे नेते अरुण चाळके व शिवसेना उबाठा गटाचे नेते नरेश अहिरे यांनी



प्रसारमाध्यमांना दिली.

गोरेगाव येथे सर्व पक्षीयांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला शिवसेना दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, विकास गायकवाड, रवी मोरे यांच्यासह बौद्ध बांधव तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकमुखाने आरोपीच्या तात्काळ अटकेची मागणी केली. या वेळी रायगडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांनी तपासासाठी आणखी काही कालावधीची गरज असल्याचे सांगत आरोपीला अटक करण्यासाठी मुदत मागितली. त्यानुसार सर्व पक्षीयांनी प्रशासनाला दोन दिवसांचा अल्टिमेटम दिला असून ३० एप्रिल पर्यंत आरोपीला अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. जर निर्धारित मुदतीत आरोपीला अटक करण्यात अपयश आले, तर २ मे रोजी शांतता पूर्ण वातावरणात सर्वपक्षीय बंद व भव्य जन आक्रोश मोर्चा काढण्यात येईल,

# जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांचा वाढदिवस उत्साहात

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड राजपुरी जी प गटात सर्वाधिक मताधिक्य घेणारे विघ्नेश माळी यांचा वाढदिवस मुरुडचे शिवसेनीचे नेते दिनेश मिणमिने यांच्या निवास्थानी मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला .मतदार संघातील शेकडो कार्यकर्त्यानी शुभेच्या दिल्या .दिनेश मिणमिने यांच्या शिवसेनेचे कार्यतालचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांच्या हस्ते करण्यात आले .केक कापून बांधकाम सेना तालुका अध्यक्ष -दिनेश मिणमिणे,राजपुरी गण संपर्क प्रमुख -जिविता मिणमिणे यांनी शुभेच्या दिल्या सोबत युवासेनेचे जिल्हा उपप्रमुख दीपेश वरणकर,-ऋषिकांत डोंगरीकर,उपतालुकाप्रमुख -मनोज कमाने, प स सदस्य अश्विनी संजय जंगम ,मंदा ठाकूर आदी शिवसेनेचे कार्यकर्ते



उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्ये जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी म्हणले मुरूड तालुक्यला कार्यसम्राट आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी ३०० कोटींचा निधी देऊन मुरूड तालुक्यावरील प्रेम दाखून दिलेले आता आमची पाळी आहे. मुरूड तालुकयातील पाणी प्रश्न, वैद्यकीय सेवा अतिशय सक्षम करण्यासाठी पर्यत करणार .मुरुडला दिनेश मिणमिने सारखे कार्यकर्ते असल्याने गोर गरिबांचे प्रश्न सोडवण्यास दिनेश सक्षम आहे. दिनेश शिवसेचा प्रमुख कार्यकर्ता आहे. नेत्यांपेक्षा जास्त काम करणारा असल्याने आमदार नेहमीच आपल्या जवळच कार्यकर्ता मानतात

दिनेश मिणमिने म्हणाले गेल्या ५० वर्षात जो विकास झाला नाही तो एकट्या महेंद्रशेठ दळवींनी केले आणि पुंढे करत राहणार आहेत मुरूड तालुक्यात असा एकही रस्ता नाही जो आमदारांनी केला नाही,मुरुड पुढील ५ वर्षात सर्वात मोठे पर्यटन स्थळ होणार त्यासाठी जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांची विशेष कार्यपद्धती कामाला येणार, अशी ग्वाही मिणमिने यांनी दिली

# ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांची गर्दी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील अरबी समुद्रातील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी

आज सकाळपासून मुंबई,पुने, सातारा,नाशिक या जिल्ह्यातुन राजपुरी जेट्टीवर पर्यटकांची गर्दी पाहायला मिळत आहे.

शनिवार-रविवार, सुट्टीचा दिवस आणि पर्यटन हंगामात किल्ल्यावर भेट देणाऱ्यांची संख्या लक्षणीय वाढते. शिडीच्या बोटीद्वारे किल्ल्यावर पोहोचण्याचा अनुभव, ऐतिहासिक वास्तू, मजबूत तटबंदी आणि समुद्राच्या मधोमध असलेले त्याचे अनोखे स्थान यामुळे पर्यटक आकर्षित होतात.इतिहासाच्या दृष्टीनेही हा किल्ला महत्त्वाचा आहे. त्यामुळे इतिहासप्रेमी देखील मोठ्या संख्येने येथे येत असतात.

मुरुड साळाव रस्त्याचे काम सुरू असल्याने मुरुड व काशीद



येथील पर्यटक संख्या रोडावली आहे.३२ किलोमीटरच्या या रस्त्यावर सर्वत्र खड्डे व असंख्य मोऱ्याची कामे यामुळे हा रस्ता धुळीने माखला आहे.रस्त्याचे काम सुरू असल्याने पर्यटक संख्या रोडावली आहे.हॉटेल व लॉजिंग व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे.हॉटेल व लॉजिंग व्यावसायिक संघटनेकडून सदरचा रस्ता लवकरात लवकर बनवावा अशी मागणी केली जात आहे.अशी बिकट परस्थिती असताना सुधा पर्यटक जंजिरा किल्ला पहाण्यासाठी आल्याने व्यासायिकांना दिलासा मिळाला आहे.

# चौकजवळ धोकादायक लेन कटींग वाहनांसाठी बंद

**खोपोली : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई पुणे महामार्गावर चौक डाक बंगला येथे असलेली धोकादायक लेन कटिंग वाहनांसाठी बंद केल्याने जीवघेणे अपघात थांबणार असून यासाठी तीन वर्षापासून पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते श्याम साळवी , सरपंच रितू ठोंबरे ,माजी सरपंच दत्ता मांडे, ग्रामपंचायत सदस्या नयना झिंगे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर चौक गावातून चौक रेल्वे स्थानक आणि नवीन वसाहतीकडे जाण्यासाठी डाक बंगला येथून महामार्ग ओलांडून जावे लागते. या ठिकाणी महामार्गाच्या मध्ये असलेले लेन कटिंग उताराची धोकादायक असल्याने वाहन चालक वेगाने महामार्गावर येत असे.

यामुळे अनेकदा अपघात घडले असून कित्येकांना जीव गमावावा लागला होता. त्यामुळे धोकादायक लेन कटिंग केवळ पादचारी उपयोगा करता असावी तसेच वाहनांना या ठिकाणी बंदी असावी अशी मागणी सातत्याने होत होती. विशेष म्हणजे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि आय आर बी अधिकाऱ्यांसोबत तीन वर्षांपूर्वी ब्लॅक स्पॉटची पाहणी केली होती

त्यावेळी या लेन कटिंगचा मुद्दा देखील उपस्थित झाला होता. त्यावर उपाययोजना करण्याचे आश्वासन देखील मिळाले होते.



# पर्यटन वृद्धीसाठी मुरूड आगाराचा पुढाकार

**मुरुड : प्रतिनिधी**

बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीद मुरूड आगाराने जपले असुन पर्यटनाला चालना मिळावी आणि ताम्हिणी घाटातील डोंगर दऱ्यांचा नयन रम्य प्रवासाचा आनंद घेता यावा म्हणून दि .१६ एप्रिल २०२६पासुन खास उन्हाळी सुट्टी निमित्त मुरुड आगारातून मुरूड – लातूर ही प्रवासी सेवा लालपरीच्या माध्यमातून सुरू केल्याची माहिती आगार व्यवस्थापक एस . टी शिंदे यांनी दिली .

ही बस मुरुड वरुन सकाळी ६ वा . तळा – इंदापूर माणगाव ताम्हीणी मार्गे स्वारगेट (पुणे ) येथे साधारण ११.०० पर्यंत पोहचते . त्यामुळे या मार्गावरून पुणे येथे ५ तासात पोहचणे शक्य झाले आहे . सदर बस स्वारगेट – भिगवण –चौफुला –इंदापूर – टेंभूर्णी – बार्शी – येडशी वरुन लातूर ला पोहचते . तसेच लातूर वरून सकाळी ६ वा मुरुड साठी मार्गस्थ होते .. सर्वच हौशी पर्यटकांना खासगी वाहनाने पर्यटन परवडते असे नाही . एस टी सारखा सुरक्षित प्रवास सर्वसामान्यांना परवडतो . या लांब पल्ल्याच्या बस सेवेमुळे मराठवाड्यातील नागरिकांना कोकण दर्शन शक्य होणार आहे . या मार्गावरील जास्तीत जास्त प्रवाशांनी बस सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन एस टी सुत्रांकडून करण्यात येत आहे .

# सहा दिवस उलटूनही तरुणी हत्याकांड प्रकरणातील आरोपी मोकाट; गोरेगाव-लोणेरेत तणाव

**माणगाव : प्रतिनिधी**

लोणेरे येथील ओमकार रेसिडेन्सी लॉजमध्ये एका निष्पाप २२ वर्षीय तरुणीवर अमानुष अत्याचार करून तिची निर्घृण हत्या झाल्यानंतर चार दिवस उलटले, तरीही आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात न आल्याने गोरगाव-लोणेरे परिसरात संतापाची ज्वाला भडकली आहे. या घटनेने संपूर्ण समाजमन सुन्न झाले असून प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न घुमत आहे. "न्याय कधी मिळणार?" १९ एप्रिल २०२६ रोजी घडलेल्या या हृदयद्रावक घटनेनंतर परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. एका निरागस मुलीच्या आयुष्यावर क्रूरतेने घाला घालणाऱ्या आरोपींना अद्याप अटक न झाल्याने नागरिकांच्या मनातील अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय व सर्वधर्मीय संघटना एकत्र येत तीव्र निषेध नोंदवत आहेत. नरेश अहिरे, विकास गायकवाड, प्रमोद घोसाळकर,अरुण चाळके, नंदकुमार शिर्के, बापू सोनगीरे, मुखतार वेळासकर, दिनेश हरवंडकर, स्वाती करकरे, स्वीटी गिरासे, प्रदीप गोरेगावकर आदी नेत्यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करत "पीडितेला न्याय मिळाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही," असा इशारा दिला आहे. दरम्यान, पोलिसांनी तपासाची गती वाढवली असून आरोपींच्या शोधासाठी विविध पथके रात्रंदिवस कार्यरत आहेत. घटनास्थळावरील पुरावे गोळा करण्यात आले असून हातांचे ठसे घेण्यात आले आहेत. मोबाईल लोकेशन तपासले जात आहे. "लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल," असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. तसेच ही केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना कठोर शिक्षा मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. गोरगाव आणि लोणेरे परिसर सध्या अतिसंवेदनशील बनला असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वातावरण आणखी चिघळू नये यासाठी प्रशासन सतर्क आहे. या प्रकरणाबाबत अनेक तर्कवितर्क मांडले जात असून अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पीडित कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या वेदनेला शब्द नाहीत. "आमच्या मुलीला न्याय मिळालाच पाहिजे," ही त्यांची आर्त हाक आता संपूर्ण समाजाची मागणी बनली आहे. या पार्श्वभूमीवर शनिवार, २५ एप्रिल २०२६ रोजी गोरगाव-लोणेरे बंदची हाक देण्यात आली होती. हा मोर्चा सकाळी १० वाजता गोरगाव शहरातून भव्य 'जन-अक्रोश मोर्चा' काढण्यात येणार होता. त्यानंतर गोरगाव पोलीस स्टेशनसमोर व राजमाता जिजाऊ मैदानात निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. आरोपींना ३० एप्रिल पर्यंत अटक न केल्यास हा मोर्चा २ मे रोजी याचवेळी आणि याच ठिकाणी निघणार आहे असे अरूण चाळके यांनी सांगितले आहे. नरेश अहिरे, विकास गायकवाड, प्रमोद घोसाळकर, अरुण चाळके, नंदकुमार शिर्के, बापू सोनगीरे, मुख्तार वेळासकर, दिनेश हरवंडकर, स्वाती करकरे, स्वीटी गिरासे, प्रदीप गोरेगावकर आदी सर्व धर्मीय व सर्व पक्षीय नेते या मोर्चात सहभागी होणार असून, मोठ्या संख्येने नागरिकही उपस्थित राहणार आहेत. ही घटना केवळ एका कुटुंबाची वेदना नाही, तर संपूर्ण समाजाच्या अस्मितेवर झालेला घाव आहे. न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा ठाम निर्धार जनतेने व्यक्त केला आहे. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा होईपर्यंत संघर्षाची ही ज्योत अशीच पेटती राहणार आहे.

# सामाजिक कार्यकर्ते मंगेश पवार यांना राज्यस्तरीय भारत सन्मान पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन (अँन्टी पायरसी सेल) मुंबई यांच्यातर्फे माणगाव तालुक्यातील मांगवली गावचे सुपुत्र तथा सामाजिक कार्यकर्ते मंगेश काळुराम पवार यांना राज्यस्तरीय भारत सन्मान पुरस्कार २०२६ ने रविवार दि. १९ एप्रिल २०२६ रोजी के.एम.अग्रवाल कॉलेज ऑडिटेरिअम गंधारीपाडा रोड,कल्याण पश्चिम याठिकाणी झालेल्या भव्यदिव्य कार्यक्रमात आयोजक मुख्य तपासिक मुंबई रामजीत (जितु) गुप्ता (आय.सी.पी),इंडियन एअर फोर्सच्या इतिशा चव्हाण,मानवाधिकार जागतिक मानव पुणे संस्थापिका अध्यक्ष प्रीती सावंत,डॉ.दिगंबर तायडे संस्थापिका ए स्टार टूर्स आणि ट्रायव्हल्स अश्विनी चुरी,विमल बिडवे,जितेंद्र जोशी,नझहत अन्सारी आदी मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत आकर्षक सन्मानचिन्ह,सन्मानपत्र,शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. मंगेश पवार यांना इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन (अँन्टी पायरसी सेल) मुंबई यांच्यातर्फे मानाच्या राज्यस्तरीय भारत सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

मंगेश पवार हे मांगवली गावासारख्या



ग्रामीण भागात गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले व्यक्तिमत्व आहे. ते समाजात सामाजिक बांधील व जातीय सलोखा राखून गेली अनेक वर्ष काम करीत आहेत. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत जिद्दीच्या,कष्टाच्या आणि मेहनतीच्या जोरावर केलेलं समाजकार्य हे अतुलनीय आहे. बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांना ते नेहमीच आपल्यापरीने शिक्षणासाठी मदतीचा हात देत असतात. तसेच पूर परिस्थिती,आपत्कालीन परिस्थिती यामधील संकटग्रस्थाना ते मदतीचा हात देत असतात. गरीब कुटुंबात जन्म घेतल्याने त्यांना गरिबीची जाणीव आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन अँटीपायरीशन मुंबई यांनी घेऊन त्यांना राज्यस्तरीय भारत सन्मान पुरस्कार २०२६ ने सन्मानित केले.

# लिंबू, कलिंगड, काकडी, ऊस, कोकमने फोडला घाम; भाव वधारले

**पाली : प्रतिनिधी**

उन्हाची काहिली वाढत आहे. त्यामुळे शरीराला थंडावा देणाऱ्या कलिंगड, लिंबू, उस आणि काकडीला मागणी वाढत आहे. परंतु नुकत्याचा झालेल्या अवकाळी पावसामुळे तसेच हवामान बदलामुळे याचे उत्पादन घटणार आहे आणि दर्जाही खालावण्याची भीती तज्ञांनी व्यक्त केली आहे. परिणामी या फळांचे भाव वाढल्याने सर्वांना घाम फुटला आहे. रायगड जिल्ह्यातील स्थानिक कलिंगडाचा गोडवा सुद्धा कमी झाला आहे.

निसर्गाची देण असलेले कलिंगड, लिंबु सरबत, उसाचा रस आणि काकडी हे उष्मा घालविण्यासाठी सर्वांसाठी सर्वात सोपा व स्वस्त पर्याय आणि आधार आहे. परंतु जिल्ह्यासह राज्यात पडलेला अवकाळी पाऊस यामुळे कलिंगड, लिंबू आणि काकडीचे नुकसान झाले आहे.

मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी १० ते १५ टक्यांनी भाव वाढले आहेत. अवकाळी पावसाने रायगडच्या कलिंगडाची गोडी उडाली आहे. त्यामुळे नाशिक व इतर ठिकाणावरील कलिंगड जिल्ह्यात विक्रीसाठी येत आहेत. लिंबाचीही आवक घटली आहे. त्यामुळे त्यांचेही भाव वधारले आहेत. लिंबाला तर संत्री आणि मोसंबी इतका भाव आहे. त्यामुळे लिंबू सरबत ही महागले आहे. कोकम व काकडीचे भावही वधारले आहे. अनेक ठिकाणी तर काकडी आणि कोकमाचे दर्शनही नाही. मागील वर्षी पेक्षा यावर्षी कलिंगडामध्ये २० ते २५ रुपयांनी वाढ झाली आहे. तर एका मोठ्या काकडीमागे ५ ते १० रुपयांनी वाढ झाली आहे. उसाचे दरही शेकड्यमागे १०० रुपयांनी वाढले आहेत. परिणामी उष्म्यापासुन बचाव करण्यासाठी आता नैसर्गिक पर्याय सोडुन कृत्रिम पर्याय निवडत आहेत. त्यामध्ये बंद बाटलीतील सरबते आणि, प्लास्टिकच्या पाऊच (शॅसे) मध्ये मिळणारी सरबत यांना मागणी वाढत आहे. अवकाळी पावासाने या वर्षी जिल्ह्यातील कलिंगडाची गोडी हरवली आहे. उत्पादन घट होणार असून कलिंगडाचा आकारही प्रमाणात नसणार आहे. तसेच माल खराब निघत आहे. भाव मिळत नाही. त्यामुळे नुकसान होत आहे. परिणामी नाशिक येथून सुगरकेन जातीचे कलिंगड विक्रीसाठी आणत आहे. असे पालीतील कलिंगड विक्रेता उमेश मढवी यांनी सांगितले.



### विराट कोहलीच्या खेळीपुढं सुदर्शनचं शतक व्यर्थ

# आरसीबीचा हंगामातील पाचवा विजय

**बंगळुरु : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ च्या एका हाय-व्होल्टेज सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं गुजरात टायटन्सचा ५ गडी राखून सहज पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना, साई सुदर्शनच्या शतकाच्या जोरावर गुजरातनं २०५ धावा केल्या. मात्र, आरसीबीनं १९व्या षटकात हे लक्ष्य पूर्ण केलं. ४४ चेंडूंमध्ये शानदार ८१ धावा करणारा विराट कोहली आरसीबीच्या विजयाचा स्टार ठरला. ७ सामन्यांमधील हा आरसीबीचा ५ वा विजय असून, त्यांनी आता गुणतालिकेत दुसरं स्थान पटकावलं आहे.



आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सनं २० षटकांत तीन गडी गमावून २०५ धावा केल्या. साई सुदर्शन आणि शुभमन गिल या सलामीच्या जोडीनं पहिल्या विकेटसाठी १२८ धावांची भागीदारी करुन गुजरात टायटन्सला चांगली सुरुवात करुन दिली. गिल ३२ धावा करुन पॅव्हेलियनमध्ये परतला. दरम्यान, सुदर्शनचे ५८ चेंडूंतील १०० धावांचं शानदार शतक दिसून आलं. आरसीबीकडून भुवनेश्वर कुमार, सुयश शर्मा आणि जोश हेझलवूड यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात चांगली झाली नाही, कारण २४ धावांवर जेकब बेथेलच्या रुपानं त्यांनी पहिली विकेट गमावली. यानंतर फलंदाजीला आलेल्या देवदत्त पडिक्कलनं विराट कोहलीला उत्कृष्ट साथ दिली आणि धावसंख्या वेगानं पुढं नेली. या सामन्यात कोहली आणि पडिक्कलनं दुसऱ्या विकेटसाठी ५९ चेंडूंमध्ये १५५ धावांची भागीदारी केली, ज्यामुळं सामना पूर्णपणे एकतर्फी झाला. या सामन्यात देवदत्त पडिक्कल ५५ धावा करुन बाद झाला, तर विराट कोहलीनं ८१ धावांची खेळी केली. गुजरात टायटन्सकडून रशीद खाननं २ बळी घेतले, तर मोहम्मद सिराज, जेसन होल्डर आणि मानव सुथार यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

## पाकिस्तानची जगात नाचक्की!

### पीएसएलला बांगलादेशने दाखवला ठेंगा

**कराची :** पीएसएल २०२६ म्हणजेच पाकिस्तान सुपर लीगचा हा हंगाम आता अक्षरशः वाद आणि गोंधळांनी भरलेला दिसत आहे. स्पर्धेदरम्यान दररोज काही ना काही धक्कादायक घडामोडी समोर येत असून, जगभरातील क्रिकेट चाहत्यांनाही आश्चर्याचा धक्का बसत आहे. यात आता आणखी एक मोठी घटना घडली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डने पाकिस्तान क्रिकेट बोर्डला मध्य स्पर्धेतच मोठा झटका दिला आहे. .

पाकिस्तान सुपर लीग २०२६ मध्ये सहभागी असलेल्या बांगलादेशच्या दोन महत्त्वाच्या खेळाडूंना अचानक स्पर्धेतून माघार घ्यावी लागली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने दिलेली 'नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट' (NOC) परत घेतल्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला. मुस्तफिजुर रहमान आणि नाहिद राणा हे दोघे अनुक्रमे लाहोर कलंदर्स आणि पेशावर झाल्मी संघांकडून खेळत होते. मात्र, बीसीबीच्या निर्णयामुळे ते आता पीएसएल २०२६ मध्ये पुढे खेळणार नाहीत. हा पाकिस्तानसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

## विश्वविजेत्या क्रिकेटपटूने अचानक केली निवृत्ती जाहीर




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडची दिग्गज महिला क्रिकेटपटू सुझी बेट्सनं आयसीसी महिला टी-२० विश्वचषकानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. हा विश्वचषक १२ जून रोजी इंग्लंड आणि वेल्समध्ये सुरु होत आहे. ही स्पर्धा ३८ वर्षीय बेट्सला तिच्या देशासाठी खेळलेल्या ३६२ आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या संख्येत भर घालण्याची शेवटची संधी देईल. जूनमध्ये सुरु होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकात सुझी बेट्स आपल्या संघाला सलग दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवून देण्याचं ध्येय ठेवेल. 'व्हाइट फर्न्स' संघाला यजमान इंग्लंड, आयर्लंड, स्कॉटलंड, श्रीलंका आणि वेस्ट इंडिज यांच्यासोबत गट 'ब' मध्ये स्थान मिळालं आहे.

आपल्या शानदार कारकिर्दीवर विचार व्यक्त करताना, बेट्सनं न्यूझीलंड क्रिकेटला सांगितलं, "जेव्हा मी गेल्या २० वर्षांकडे मागे वळून पाहते, तेव्हा वेळ किती लवकर निघून गेला यावर माझा विश्वास बसत नाही. 'फर्न' (न्यूझीलंड संघाचं चिन्ह) इतक्या वेळा परिधान केल्याचा मला खूप अभिमान आहे. या संघासाठी दररोज एक चांगली व्यक्ती, संघसहकारी, क्रिकेटपटू आणि खेळाडू बनण्याचा प्रयत्न करण्यात मला प्रचंड उद्देश आणि आनंद मिळतो."

सुझी बेट्सनं तिच्या कारकिर्दीत १८१ वनडे आणि १८१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. तिच्या नावावर वनडे सामन्यांमध्ये ५९६४ धावा आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ४७१७ धावा आहेत. बेट्सनं सर्व फॉरमॅटमध्ये मिळून १४ शतकं झळकावली आहेत आणि १४५ बळी घेतले आहेत. तिनं २००६ मध्ये भारताविरुद्ध पदार्पण केलं. बेट्सने २०११ ते २०१८ दरम्यान न्यूझीलंडचं कर्णधारपदही भूषवले. २०१३ मध्ये, तिला आयसीसी महिला वनडे वर्षातील सर्वोत्तम क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आलं. त्याच वर्षी भारतात झालेल्या विश्वचषक स्पर्धेत तिने उत्कृष्ट कामगिरी केली आणि सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली.

## दिल्लीच्या खेळाडूच्या चेहऱ्यावर लागला चेंडू



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या १९व्या हंगामातील ३५वा साखळी सामना २५ एप्रिल रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्स यांच्यात खेळला, मात्र सामन्याच्या एक दिवस आधी, सराव सत्रादरम्यान दिल्ली कॅपिटल्सचा एक नेट बॉलर बाउन्सरमुळं गंभीर जखमी झाला. चेहऱ्यावर चेंडू लागल्यानंतर तो प्रचंड वेदनेत होता आणि त्याच्या चेहऱ्याचून प्रचंड रक्तस्त्राव होत होता.

जेव्हा सराव सत्रादरम्यान दिल्ली कॅपिटल्सच्या एका नेट बॉलरच्या चेहऱ्यावर बाउन्सर लागला, तेव्हा तो मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत असताना लगेचच जमिनीवर कोसळला. दुखापतीनंतर तो खेळाडू स्पष्टपणे वेदनेत होता. दिल्ली कॅपिटल्सचे वैद्यकीय कर्मचारी आणि स्टेडियममधील आपत्कालीन कर्मचारी तातडीने त्याच्या मदतीला धावून आले. त्यानंतर त्याला स्ट्रेचरवर ठेवून रुग्णवाहिकेद्वारे थेट मैदानावरुन रुग्णालयात नेण्यात आलं. दिल्ली कॅपिटल्सनं अद्याप या खेळाडूबाबत कोणतीही अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही, कारण त्याच्या प्रकृतीबद्दल अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती प्रसिद्ध झालेली नाही.

## महात्मा फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे मोफत धडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा फुले आर्ट सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालय पनवेल व रायगड तायकवोंडो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जवळपास ७०० विद्यार्थिनींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉक्टर गणेश ठाकूर आपल्या भाषणात म्हणाले की, सुभाष पाटील हे आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी असून ते स्वतः कॉलेज साठी दरवर्षी आपल्या विद्यार्थिनींना मोफत प्रशिक्षण



देतात त्यांचे खूप मोठे योगदान आहे. आपल्या कॉलेजच्या विद्यार्थिनींना तायक्वॉन्डो या खेळामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवून दिलेली आहेत. खेलो इंडिया स्पर्धेसाठी आपल्या कॉलेजची विद्यार्थिनी निर्मिती दत्ता हिची निवड झाली होती, कॉलेजच्या विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिक शक्तीला चालना देण्यासाठी तसेच कॉलेज आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याचा उद्देशाने त्यांना स्वयंसेरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले.

महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थिनींची छेड काढण्याचे प्रकार घडतात अनेकदा त्यांच्यावर वाईट प्रसंग ही वाढवतात अशी अनेक उदाहरणे सांगता येतील तेव्हा अशा प्रकारच्या घटनाही वारंवार घडतात महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात महिला सुरक्षित राहिल्या पाहिजेत विशेषतः कॉलेजच्या विद्यार्थिनींचे स्वयंरक्षणासाठी आत्मबल वाढले पाहिजे. त्याचबरोबर मुलींनी गुन्हेगारी विरोधात लढण्यासाठी सक्षम व्हावे या उद्देशाने महात्मा फुले कॉलेज अंतर्गत असे उपक्रम राबविण्यात येतात.

हे प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय पंच सातवी डिग्री व मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील यांचे सहकारी अनिल म्हात्रे, तेजस माळी, अक्षता भगत, निर्मिती दत्ता पल्लवी म्हात्रे श्रेया लालु द्रुवल सालियान समर्थ बराटे आणि सनी पासवान इत्यादींचे मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे या सेमिनारसाठी महाविद्यालयच्या सर्व शिक्षिका उपस्थित होत्या आणि त्यांनी ही प्रशिक्षण घेतले, असे सुभाष पाटील नी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## तुषार सिनलकर यांची पंच प्रमुख म्हणून नियुक्ती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

३६ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २० ते २७ एप्रिल २०२६ दरम्यान मुंबईतील कलिना येथील पोलीस मुख्यालय व मुंबई विद्यापीठाच्या प्रांगणात पार पडत असून या स्पर्धांमध्ये विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून तायक्वांदो स्पर्धा २१ ते २३ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेसाठी ५ डॅन ब्लॅक बेल्ट, आंतरराष्ट्रीय पंच तुषार तानाजी सिनलकर यांना पंच प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आले होते. महाराष्ट्र पोलीस क्रीडा दलाकडून आयोजन व समन्वय समितीमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक व राष्ट्रीय तायक्वांदो खेळाडू युवराज पोठरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक व राष्ट्रीय जुडो खेळाडू मनिषा तुले तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त हवलदार





धनवती गाडगीळ यांचे मोलाचे योगदान लाभले.

या स्पर्धेसाठी इंडिया तायक्वांडोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या अधिकृत राज्य संघटनेमार्फत अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफार पठाण व कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी यांनी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पदक विजेते तसेच ठाणे जिल्हा संघटनेचे सचिव रोहित जाधव यांना स्पर्धेचे डायरेक्टर म्हणून तर ४ आंतरराष्ट्रीय पंच (तुषार सिनलकर - रायगड, इम्रान खान - मुंबई उपनगर, सेजल ओझा - नागपूर, पवन झोल - अकोला) व ८ राष्ट्रीय पंच (माधेश्वरन, अमोल माळी, ओमकार गिरे, अमित धाडवे, आदित्य सोनवणे, निहाल भोईर, रमणी गजमल, दिक्षा वाडकर) नियुक्त केले होते.

स्पर्धा शिस्तबद्ध वातावरणात पारदर्शक व निःपक्षपातीने पार पडल्या असून संपूर्ण राज्यभरातील १३ पोलीस परिक्षेत्र व घटकातील पोलीस खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या स्पर्धेतून राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

## हॉकीपटू गुरबक्ष सिंग ग्रेवाल यांचे निधन



**मुंबई :** भारतीय हॉकीचे दिग्गज आणि १९६८ ऑलिम्पिक कांस्यपदक विजेते गुरबक्स सिंग ग्रेवाल यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते, त्यांनी झिराकपूर येथे अखेरचा श्वास घेतला.

हॉकी इंडियाने त्यांच्या निधनाची पुष्टी केली आहे. हॉकी इंडियाच्या माहितीनुसार,गुरबक्ष सिंग ग्रेवाल हे १९६८ च्या मेक्सिको सिटी ऑलिम्पिकमध्ये देशासाठी कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग होते. भारतीय हॉकीच्या इतिहासातील त्या मोजक्या खेळाडूंपैकी ते एक होते, ज्यांनी आपल्या कामगिरीने आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाला गौरव मिळवून दिला.

त्यांच्या विशेष कामगिरींपैकी एक म्हणजे, त्यांनी त्यांचे बंधू बलबीर सिंग ग्रेवाल यांच्यासोबत एकाच ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. ही एक दुर्मिळ घटना होती, जेव्हा दोन सख्खे भाऊ एकाच ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघाचा भाग होते. खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतरही, गुरबक्स सिंग ग्रेवाल यांनी हॉकीशी आपले नाते जपले होते. त्यांनी पश्चिम रेल्वेमध्ये वरिष्ठ क्रीडा अधिकारी म्हणून काम केले आणि राजस्थानमधील खेळाडूंसह अनेक प्रतिभावान खेळाडूंना रेल्वे हॉकी संघात ओळखण्यात व भरती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.


वर्ष १३ वे | ।। ॐ श्री बाळकृष्णाय नमः।। | स्थापना २०१४



श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

## तेरावी पुण्यतिथी सोहळा

आपणांस कळविण्यात येते की, आमच्या माताजी स्वानंद सुख निवासी **'श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर'** यांची तेरावी पुण्यतिथी मिती वैशाख शु. १२, शके १९४८ मंगळवार दि. २८/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. **श्री. स. स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर,** यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथाचे पारायण श्री दासबोध वाचण पर्वणी प्रारंभ, मिती वैशाख शु. १३, बुधवार दि. २९/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधु भगिनीनी उपस्थित रहावे, ही विनंती.

### मंगळवार, दिनांक २८/०४/२०२६७

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० -भजन** | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, पखवाज: जयराम म्हात्रे (न्हावा)<br>आत्माराम मोकल |
| **सकाळी १०.०० ते १२.००- प्रवचन** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर,<br>ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज, चिपळूण,<br>श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| **दुपारी ०३.०० ते ०४.००-भजन** | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण,<br>गायक : हेमंत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| **दुपारी ०४.०० ते ०५.००-भजन** | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण-कोपर,<br>गायीका : श्रीमती हिराबाई घरत, सौ. आनंदी घरत,<br>सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत<br>श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर,<br>गायीका : सौ. सुप्रिया घरत, वादक : तुषार घरत<br>टाळकरी : सौ. शितल घरत-कोपर |
| **सायं. ०५.०० ते ०६.००- भजन** | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर<br>गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर,<br>श्री. हर्षल फडके, पखवाज : श्री. मधुकर डोंगरे |
| **सायं. ०६.०० ते ०७.००- आरती** | माऊलींची आरती |
| **रात्री ०८.०० ते ०९.००** | दत्त प्रसादीक भजन मंडळ, खारकोपर, बुवा : वसंतशेठ पाटील<br>पखवाज : गौरव म्हात्रे आणि तुकाराम कोळी |
| **रात्री ०९.०० ते ११.००- किर्तन** | प्रभोदनकार ह. भ. प. महेशजी महाराज साळुंखे,<br>श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल), वादक: ह.भ.प. आदित्य पाटील,<br>गायक: ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| **रात्री ११ नंतर** | रात्रीचे बारा अभंग,<br>जागर (भजन-सार्वजनिक गुरुबंधू भगिनी) |

### बुधवार दिनांक २९/०४/२०२६

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.००- भजन** | नादब्रम्हा भजन मंडळ, रांजणपाडा (खारघर)<br>बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील-कोपर,<br>ज्ञानेश्वर म्हात्रे-गव्हाण, गणपत ठाकूर - कोपर, नितीन ठाकूर - त. पाडा, श्री. महेश पाटील, न्हावा, पखवाज : निलेश पाटील |
| **सकाळी १०.०० ते १२.००** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, |
| **दुपारी १२.०० वाजता** | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

### कार्यक्रमाचे ठिकाण

**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**
**मु.शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५**

### व्यवस्थापक

**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**
**शिवाजीनगर- गव्हाण-न्हावेखाडी- कोपर (संचलित) ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**

### संयोजक

**श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार) आणि ठाकूर परिवार.**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com